# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०९ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १८, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वित्त व नियोजन, वने मंत्री** | |
| **(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री** | |
| **(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** | |
| **(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८७**

---

### नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) येथील गावठाण व वन विभागाच्या जागेवर बेकायदेशीररित्या प्लॉट करुन विक्री केल्याबाबत

**(१) * ८५६९७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) पूर्वेकडील असलेल्या डोंगरावरील वासगाव आदीवासीवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गावठाण व वन विभागाच्या जागेवर प्लॉट करून बेकायदेशीररित्या विक्री केल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील पाटणसई ग्रामपंचायत हद्दीतील वासगाव वाडीतील अनेक कुटुंबियांनी कमी किंमतीत प्लॉट मिळत असल्याने बेकायदेशीररित्या पाडलेले प्लॉट खरेदी केले असून उक्त जागेवर कोणत्याही मुल्यनिर्धारणची (असेसमेंट) नोंद ग्रामपंचायतीच्या दफ्तरी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार गावठाण व वन विभागाच्या जागेवर बेकायदेशीररित्या प्लॉट करून विक्री करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, दि. १६/०६/२०१७ रोजीच्या दै. कर्नाळा या वर्तमानपत्रात गावठाणाच्या भूखंडावर भूमाफीयांचा डोळा, जागेचे प्लॉट करुन विकल्याने खळबळ/अतिक्रमण भासविण्याचा प्रयत्न व गैरप्रकारावर कारवाई करणेची नागरिकांची मागणी असे वृत्त प्रसिध्द झाले आहे.

(२), (३) व (४) या वृत्ताच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीने सदर जागेची पाहणी केली असता सदर जागेवर अंदाजे १२ ते १४ साध्या ताडपत्री अच्छादीत झोपड्या उभारलेल्या दिसून आल्या. ग्रामपंचायतच्या उपलब्ध रेकॉर्ड नुसार सदर जागा गावठाण असल्याचे दिसून आले नाही. झोपडीधारकांकडे प्लॉट खरेदीचे कोणतेही कागदपत्र प्रथम दर्शनी दिसून येत नाहीत. ग्रामपंचायत नागोठणे यांनी दि. ०४/०७/२०१७ च्या पत्राने तहसिलदार, रोहा यांना सदरची जागा गावठाण, महसूल किंवा वनखाते यापैकी कोणाच्या ताब्यात आहे याबाबत मार्गदर्शन मागविणेत आले आहे ते प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## नाशिक जिल्हा रुग्णालयात बनावट अपंगत्वाचे दाखले वितरीत करण्यात येत असल्याबाबत

**(२) * ९०२०८ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा रुग्णालयात सुदृढ व्यक्तींना आठ हजार रुपयात बनावट अपंगत्वाचे दाखले देणाऱ्या व्यक्ती कार्यरत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट अपंगत्वाचे दाखले देण्याच्या या गैरकारभारामध्ये जिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचा देखील समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार बनावट अपंगत्वाचे दाखले देणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) दलित आदिवासी बहुजन सेना, नाशिक या जिल्हा संघटनेचे दि.२५.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा शल्य चिकीत्सक जिल्हा रूग्णालय नाशिक यांच्याकडे अपंग प्रमाणपत्रासाठी ८ ते१० हजार रूपये घेतले जातात, अशी तक्रार केली होती.

(२) नाही.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा रुग्णालय, नाशिक यांच्याकडून चौकशी केली असता तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रक्तपेढ्यांना रक्तघटक विलगीकरणासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३) * ८६०९८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशामध्ये राज्याचा रक्तसंचय करण्यात पहिला क्रमांक असताना त्याचा योग्य वेळी वापर व साठवणूक होत नसल्याने ते वाया जात असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील रक्तपेढ्यांमध्ये परस्पर समन्वय नसल्याने रक्तातील घटक वेगळे करण्याकरिता कोणत्याही आधुनिक सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील रक्तपेढ्या व रुग्णालये यांच्यात परस्पर समन्वय साधण्याकरिता विशिष्ट यंत्रणा तयार करण्याबाबत, रक्त साठविण्यासाठी व रक्तातील घटक वेगळे करण्यासाठी शासकीय, निमशासकीय रक्तपेढ्यांना आधुनिक सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अशंत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यात रक्ताचा पुरेपुर उपयोग होण्याच्या दृष्टीने राज्यातील ३२६ रक्तपेढयांपैकी २७२ रक्तपेढयांमध्ये रक्तघटक विलगीकरणाची सोय आहे. या २७२ रक्तपेढयांपैकी २३ जिल्हास्तरीय शासकीय रक्तपेढया आहेत. तसेच उर्वरीत ११ जिल्हास्तरीय शासकीय रक्तपेढयांमध्ये रक्त घटक विलगीकरण केंद्र सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद (NBTC), नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार अतिरिक्त रक्त व रक्तघटक एका रक्तपेढीतून दुसऱ्या रक्तपेढीमध्ये हस्तांतरीत करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) येथील गोखिवरे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याने केलेला गैरव्यवहार

**(४) * ८६१८३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील गोखिवरे वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहार प्रकरणाची लोकप्रतिनिधींनी मा.वनेमंत्री यांचेकडे केलेल्या तक्रारीनुसार शासनाने माहे जून, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडून चौकशी करुन अहवाल मागितला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) मौजे बापाणे सर्वे नंबर ११४ व कामण सर्वे नंबर २१० मधील वन जमिनीवरील बेकायदा बांधकामे व अतिक्रमणासंदर्भात संबंधित वनक्षेत्रपाल यांना दिनांक २८.०७.२०१६ रोजी निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संबंधित वनक्षेत्रपाल यांच्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अंतर्गत मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी दिनांक ११.०४.२०१७ रोजीच्या ज्ञापनान्वये दोषारोप पत्र बजावले आहे. याबाबत प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, कोकण भवन यांचेमार्फत चौकशीची कार्यवाही सुरू आहे. चौकशी अहवाल अप्राप्त आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याअनुषंगाने नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## सांगली व औरंगाबाद येथील रुग्णालयातील अवैध गर्भपाताबाबत

**(५) * ८९२८९ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या चार वर्षामध्ये गर्भपाताच्या प्रमाणात वाढ झाली असून सांगली व औरंगाबाद शहरातील रुग्णालयांच्या केलेल्या तपासणीत बेकायदेशीररित्या गर्भलिंग निदान करून गर्भपात केला जात असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार सांगली व औरंगाबाद शहरातील बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदान करून गर्भपात करणाऱ्या संबंधित डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये एका डॉक्टरांचे गर्भपात केंद्र नोंदणीकृत नसतानाही तेथे अवैध गर्भपात करीत असल्याची तक्रार पोलीसांकडे प्राप्त झाली आहे.

सांगली मिरज मनपातांर्गत मिरज शहरात दि.१७.५.२०१७ रोजी केंद्र शासनाच्या पथकासोबत समुचित प्राधिकारी, मिरज मनपा यांनी मिरज येथील एका सोनोग्राफी केंद्राची तपासणी केली असता, त्यावेळी सोनोग्राफी संबंधी रेकॉर्डमध्ये त्रुटी आढळून आल्याने पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) होय.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत अवैध गर्भपात करणाऱ्या डॉक्टराविरुध्द भारतीय दंडसंहिता १८६० च्या कलम ३१३ व ३४ नुसार गुन्हा दाखल झाला असून पुढील न्यायालयीन कार्यवाही सुरु आहे. आरोग्य अभियानाअंतर्गत कार्यरत असलेल्या या डॉक्टरांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

मिरज येथील डॉक्टराच्या सोनोग्राफी केंद्राच्या तपासणी दरम्यान त्रुटी आढळल्याने सदर मशीन तात्काळ सिल करुन मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्यात आली आहे. या डॉक्टरविरुध्द पीसीपीएनडीटी कायद्यातील कलमाचा भंग केल्याप्रकरणी मॅजिस्ट्रेट वर्ग १ मिरज यांच्या कोर्टात केस दाखल केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ताकारी उपसा सिंचन (जि.सांगली) योजनेच्या वितरीका क्र. २ चे काम बंद असल्याबाबत

**(६) * ८८७१९ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील ताकारी उपसा सिंचन योजनेच्या वितरीका क्र. २ चे काम गेल्या अनेक वर्षापासून बंद असल्याने ताकारी योजनेच्या विभाग़ीय कार्यालयावर दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून काम सुरु करण्याची मागणी कार्यकारी अभियंता यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाद्वारे केलेल्या मागणीनुसार ताकारी उपसा सिंचन योजनेच्या वितरीका क्र. २ चे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) सदर वितरीकेचे बांधकाम प्रचलित शासन धोरणास अनुसरुन बंद नलिकेव्दारे करण्यासाठी सर्वेक्षण, संकल्पन व अंदाजपत्रक तयार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश (नीट) परीक्षेत झालेला गैरव्यवहार

**(७) * ८६६१० डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दिनांक १४ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश (नीट) परीक्षेच्या प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ लाख रुपयांना विकण्यात आल्याचे प्रकरण निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, चौकशीनुसार या प्रकरणातील किती व्यक्तींना अटक करुन शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) असे प्रकरण शासनास आढळून आले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ॲन्टीडी, आरएचडी ३०० एमसीजी या औषधांच्या खरेदीत झालेली अनियमितता

**(८) * ९३४२९ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ॲन्टीडी, आरएचडी ३०० एमसीजी या औषधांच्या खरेदीत सन २०१३ ते २०१७ या कालावधीत मोठया प्रमाणात अनियमितता झाली असून याची

चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यांत यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हा रुग्णालयाला ॲन्टीडीच्या ४ हजार ८०० पुरविण्यात आलेल्या औषधांच्या बाटल्या गरजेपेक्षा जास्त असल्याने त्या परत घेण्याबाबत रत्नागिरी रुग्णालयाच्या शल्यचिकित्सकांनी दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी संचालक, आरोग्य विभाग यांना पत्र पाठवूनसुध्दा त्या परत न घेतल्यामुळे सदरहू औषधे वाया गेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी यांनी एकूण ७,१०० इंन्जे. अँटी डी औषधांची मागणी नोंदविली होती. त्यानुसार जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे ४,८०० इंन्जे. अँटी डी औषधांचा पुरवठा करण्यात आला. तथापि, अपेक्षे इतके रुग्ण न आल्याने २,२९३ इंन्जे. अँटी डी मुदतबाह्य झाले. पुरवठा करण्यात आलेल्या इंन्जे. अँटी डी चा सेल्फ़ लाइफ कमी असल्याने सदर औषध बदलून देण्याबाबत पुरवठादारास कळविण्यात आले असून त्या प्रित्यर्थचे रुपये ६४,०३,३०६/- इतक्या रकमेचे देयक अदा करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील शासकीय रुग्णालयात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांमध्ये महिलांच्या मृत्यूंचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(९) * ८५६७१ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शासकीय रुग्णालयांमध्ये करण्यात आलेल्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर गेल्या काही वर्षात ३३ महिलांचा मृत्यू झाला असून सन २०१५-१६ या वर्षामध्ये सर्वात जास्त म्हणजे १० महिलांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलांचा मृत्यू वैद्यकीय सेवेतील लोकांच्या गैरकारभारामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील शासकीय रुग्णालयातील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे. तथापि, सदर मृत्यू सन २००९ ते २०१७ पर्यंत झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

७ मृत्यू हे कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेशी संबंध असलेल्या कारणामुळे म्हणजेच आतडयांना इजा झाल्यामुळे जंतू संसर्ग, रक्तवाहिन्यांना ईजा झाल्यामुळे गंभीर आघात इत्यादी या कारणामुळे झाल्याचे निदर्शनास आले असून अन्य २७ मृत्यू हे कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेशी संलग्न परंतु मोठया स्वरुपाच्या शस्त्रक्रियेच्या गुंतागुंतीमुळे झाले आहेत.

(३) कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर होणारे मृत्यू, असफल शस्त्रक्रिया, गुंतागुंत याबाबतचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरावर राज्यगुणवत्ता आश्वासन उप समिती व जिल्हा स्तरावर जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती स्थापन करण्यात आली असून समितीच्या बैठकीमध्ये अशाप्रकारे होणाऱ्या मृत्यूचे अन्वेषण करुन भविष्यात अशा घटना पुन्हा होऊ नये याबाबत राज्य व जिल्हयातील सर्व संस्थांना सूचना देण्यात येतात. राज्यामध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर दर्जेदार सेवा देऊन होणाऱ्या मृत्यूंचा प्रतिबंध करण्यासाठी सर्व स्तरावर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या असून ठरावीक दिवशी सत्र आयोजन करण्याच्या आराखडयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

जिल्हास्तर व मनपा स्तरावरील अधिकाऱ्यांनी कुटुंब नियोजन सत्रांना भेटी देऊन उपलब्ध सेवा सुविधांचे निरीक्षण, प्रत्यक्ष शस्त्रक्रियागृह निर्जंतुकीकरण, साहित्य निर्जंतुकीकरण इत्यादींचे प्रत्यक्ष निरीक्षण व प्रत्यक्ष लाभार्थींची मुलाखत याची माहिती घेऊन असलेल्या त्रुटींची संस्था व जिल्हास्तरावर निराकरण कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालयासाठी नवीन पदे मंजूर करण्याबाबत

**(१०) * ९२९१७ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होत आले असून नाशिक - शिर्डी, नाशिक - पुणे ह्या अत्यंत रहदारीचे व अपघातांचे रस्ते सिन्नर येथून जात असल्याने या रुग्णालयात नवीन पदे मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यात सर्वात जास्त अपघातांची संख्या सिन्नर येथे असून या रुग्णालयात सर्वसामान्य नागरिकांना चांगल्याप्रकारे वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यासाठी व या रुग्णालयासाठी नवीन पदे मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अशंत: खरे आहे.

दिनांक २४.०४.२०१७ च्या पत्रान्वये लेखी मागणी करण्यात आली आहे.

(२) ग्रामीण रुग्णालय सिन्नर चे ८० टक्के बांधकाम पूर्ण झाले असून पद निर्मिती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात अस्थिरोग शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या साहित्यांचा पुरवठा करण्याबाबत

**(११) * ९१७३४ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील सामान्य रुग्णालयात अस्थिरोगाच्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या किंमती साहित्यांचा पुरवठा गेल्या दोन वर्षापासून होत नसल्याने गरजू रुग्णांच्या अस्थिशस्त्रक्रिया प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिप रिपलेस्मेंट शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या वॉल अभावी जवळपास ५० गरजू रुग्ण शस्त्रक्रियेच्या प्रतीक्षा यादीमध्ये आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या साहित्यांचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) जिल्हा रुग्णालय, भंडारा येथे अस्थिरोग शस्त्रक्रियेसाठी लागणारी साहित्य सामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(१२) * ९३२८६ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बिजघर ग्रामदेवताकडे जाणारा रस्ता, कुळवंडी - शिंदेवाडी, कळंबणी - दंडवाडी, शिरवली - दंडवाडी, दिवाण - खवटी, नातुनगर - गावडेवाडी या रस्त्यांची दुरवस्था झाली असून या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांच्या कामासाठी अंदाजे ८० लक्ष रुपयांची आवश्यकता असून सदर निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वित्त मंत्री व मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ०२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यांची पाहणी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन ग्रामविकास विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) जिल्हा परिषदेमार्फत रस्त्यांची पाहणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्नामध्ये एकूण ६ रस्त्यांचा समावेश आहे.

अ) बिजघर ग्रामदेवतेकडे जाणारा रस्ता हा योजनाबाह्य रस्ता आहे. या रस्त्याची एकूण लांबी १/४०० कि.मी. आहे. रस्त्याचा संपूर्ण पृष्ठभाग खडीचा आहे. या रस्त्याच्या कि.मी.०/६०० मध्ये बिजघर ग्रामदेवता मंदीर आहे. या रस्त्यावर एस.टी वाहतूक नाही तथापि, खाजगी वाहनांची वाहतूक असते.

ब) कुळवंडी देऊळवाडी शिंदेवाडी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. १८२ असून त्याची एकूण लांबी ३.२०० कि.मी. आहे. त्यापैकी १/२०० कि.मी. लांबी अस्तित्वात आहे. १/२०० ते ३/२०० लांबी अस्तित्वात नाही. सदर २/०० कि.मी.लांबीचा रस्ता नवीन तयार करणे आवश्यक आहे.

क) रा.मा. ते कळबणी बु. दंडवाडी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२२१ असून रस्ते विकास योजनेनुसार त्याची लांबी १/५०० कि.मी.दर्शविली आहे. प्रत्यक्षात या रस्त्याची एकूण लांबी २/३०० कि.मी. लांबी अस्तित्वात आहे. संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे. त्यापैकी १/१०० कि.मी. पृष्ठभाग सुस्थितीत आहे. सन २०१४-१५ मध्ये २५१५ अंतर्गत कि.मी. ०/३०० ते ०/६०० मध्ये डांबरी नुतनीकरणाचे रु ५.०० लक्षचे पूर्ण करण्यात आले आहे.

ड) शिरवली दंडवाडी हा योजनाबाहय रस्ता असून या रस्त्याची एकूण लांबी २/०० कि.मी. आहे. त्यापैकी १/०० कि.मी. पृष्ठभाग डांबरी आहे. त्यापैकी ०/४०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे.

इ) रा.म.१७ ते दिवाणखवटी खालचीवाडी गणपतीवाडी, बुध्दवाडी ते रेल्वेस्टेशनला जोडणारा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१५४ आहे. या रस्त्याची एकूण लांबी ३.५०० कि.मी. आहे. त्यापैकी २/०० कि.मी. लांबी अस्तित्वात आहे व १/५०० लांबी नवीन तयार करण्याची आवश्यकता आहे. सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत या रस्त्याचे कि.मी. ०/५०० ते ०/७५० मध्ये डांबरीकरणाचे रु. ५.०० लक्ष किंमतीचे काम पुर्ण करण्यात आले आहे

ई) रा.म. मा.१७ ते नातूनगर तांबडवाडी गावडेवाडी रस्ता ग्रामीण मार्ग क्र. १७६ असून रस्त्याची एकूण लांबी २/०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/० ते १/१०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची आहे.

वरीलपैकी अ आणि ड या योजनाबाहय रस्त्यांची कामे ही ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती योजनेअंतर्गत घेता येत नाहीत. त्यामुळे ही कामे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेणे आवश्यक आहे.

तसेच उर्वरीत रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकष यांच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील अनेक गावांमध्ये स्मशानभूमी नसल्याबाबत

**(१३) * ९१११५ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील काही गावांमध्ये अद्‌यापही स्मशानभूमीच नसल्याचे व असलेल्या गावांमधील स्मशानभूमीमध्ये कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध नसल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन स्मशानभूमी नसलेल्या गावांमध्ये स्मशानभूमी उभारण्याबाबत व स्मशानभूमीत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण १३०९ ग्रामपंचायती असून त्यापैकी ५२९ ग्रामपंचायतींना स्मशानभूमीच्या सुविधा उपलब्ध आहेत. सुविधा उपलब्ध नसलेल्या व अपूर्ण सुविधा असलेल्या ग्रामपंचायतींना जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मंजूर नियतव्ययाच्या मर्यादेत प्रति वर्षी कामे मंजूर करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पांढुर्णा (खु.) (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथे प्रस्तावित साठवण तलावाचे काम सुरू करण्याबाबत

**(१४) * ९३५०९ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पांढुर्णा (खु.) (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथे प्रस्तावित साठवण तलावाचे काम सुरू करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर यांना निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार मुख्य अभियंता यांनी सदरहू प्रकरणी अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती यांनी दिनांक ७ जून, २०१६ रोजी पत्र देऊन कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असतानाही एक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंबामुळे सीएसआरच्या दरामध्ये झालेल्या वाढीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व सदरहू प्रकल्पाचे काम सुरु होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे.

मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर यांचे पत्रानुसार योजना कार्यान्वयाबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली. परंतु नवीन भु-संपादन कायदा २०१३ नुसार भु-संपादनाच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्यामुळे सद्यस्थितीत प्रकल्प शासनाच्या प्रचलित मापदंडात असफल होत आहे. तसेच विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाचा कालावधी मार्च २०१७ मध्ये संपलेला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत अपूर्ण / प्रगतीपथावरील प्रकल्प अन्य योजनांमध्ये वर्ग करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडकवासला (जि.पुणे) धरणातून स्वारगेट व पर्वतीमार्गे जाणाऱ्या कालव्याच्या भिंतींना तडे गेल्याबाबत

**(१५) * ९३५३८ श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरणातून स्वारगेट व पर्वतीमार्गे जाणाऱ्या कालव्याच्या भिंतींना तडे गेले असल्याने लाखो लिटर पाण्याचा अपव्यय होत असून कालवा फुटण्याची शक्यता निर्माण झाली असतानाही जलसंपदा विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याची बाब दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कालव्याची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर कालवा दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. नवीन मुठा उजवा कालवा कि.मी.१ ते १७ मध्ये काही ठिकाणी भराव खचलेला आहे व काही ठिकाणी दगडी संरक्षक भिंती ढासळलेल्या आहेत, त्यामुळे काही ठिकाणी गळती होत आहे. पर्वती जलकेंद्र हे नवीन मुठा उजवा कालवा कि.मी.१२ मध्ये व लष्कर जलकेंद्र हे नवीन मुठा उजवा कालवा कि.मी.१७ मध्ये असून त्यासाठी नवीन मुठा उजवा कालवा हा पिण्याच्या पाण्यासाठी सतत सुरु ठेवावा लागतो म्हणून कालवा दुरुस्तीसाठी कालावधी मिळत नाही. कालव्याच्या दुरुस्तीकडे जलसंपदा विभागाचे दुर्लक्ष झालेले नाही.

(२) होय.

(३) सदर कालवा दुरुस्तीची अंदाजपत्रके मंजूर करणेत आली असून निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. तसेच किमी ० ते १७ मधील कालव्यांच्या दुरुस्तीचे काम व या भागातील गळती दुरुस्ती व कालवा सुरक्षाकामे प्राधान्याने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील बालगुन्हेगारांच्या निरिक्षणगृहातून मुलांनी पलायन केल्याबाबत

**(१६) * ८६५८२ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील बालगुन्हेगारांच्या निरिक्षणगृहातून १२ ते १७ वयोगटातील १० मुलांनी निरिक्षणगृहातील हॉलच्या खिडकीचे गज वाकवून पलायन केल्याची घटना दिनांक ८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन पलायन केलेल्या मुलांना पकडण्याबाबत व अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) पलायन केलेल्या १० मुलांपैकी ८ मुले पोलीसांमार्फत पुन्हा निरीक्षणगृहात दाखल करण्यात आली आहेत.

सद्य: स्थितीत पोलीस आयुक्तालयामार्फत दिवसा २ व रात्री २ असे पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्याच बरोबर संस्थेमध्ये CCTV लावण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा (जि.वर्धा) शहरातील ग्रामपंचायत क्षेत्रात येत असलेल्या परिसरात बेकायदेशीररित्या झालेली बांधकामे

**(१७) * ८८६९७ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा (जि.वर्धा) शहरातील ग्रामपंचायत क्षेत्रात येत असलेल्या महत्वाच्या परिसरात बांधकामास बंदी असतानाही सुमारे ४ हजारापेक्षा अधिक अनधिकृत बांधकामे करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्धा लगतच्या सावंगी, सिंधी, बोरगांव, पिपरी व अन्य ११ ग्रामपंचायत क्षेत्रात बांधकामास मंजूरी देण्यास मनाई आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनधिकृत बांधकामांच्या प्रकरणातील महत्वाच्या फाईल्स गहाळ झाल्याचे माहितीचा अधिकार मधून प्राप्त झालेल्या माहितीतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) वर्धा शहरातील ग्रामपंचायत क्षेत्रात बांधकामास परवानगी देण्यास बंदी नव्हती, परंतु गावठाण व विस्तारीत गावठाण क्षेत्राबाहेर अनेक अनधिकृत बांधकामे झाली आहेत ही वस्तुस्थिती आहे.

सदर प्रकरणी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये पोलीस स्टेशन सावंगी (मेघे) येथे गुन्हा नोंद झाल्याने, स्थानिक गुन्हे शाखा वर्धाकडून गुन्हयाचा तपासासाठी बांधकाम विषयक रेकॉर्ड जप्त करण्यात आले आहे. त्यामुळे नेमकी किती अनधिकृत बांधकामे झालीत हे निश्चित होत नाही.

(२) नाही.

(३) ग्रामपंचायत नालवाडी येथील बांधकामाच्या प्रकरणातील ३२ फाईल्स दिसत नसल्याबाबत तेथील ग्रामविकास अधिकारी यांनी पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली आहे.

(४) सदर प्रकरणात तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी चौकशीचे आदेश दिलेले नाहीत.

तथापि, सदर प्रकरणी राज्य माहिती आयुक्त, नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या दिनांक १७/१२/२०१५ च्या आदेशास अनुसरुन वर्धा शहरालगतच्या ११ गावांबाबत पोलिस स्टेशनमध्ये FIR दाखल करण्यात आला असून, त्या अनुषंगाने पोलिस स्टेशन सावंगी (मेघे) मार्फत तपास सुरु करण्यात आला आहे. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद वर्धा मार्फत चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे. या चौकशी समितीने ग्रामपंचायत सिंदी (मेघे) येथील उपलब्ध दस्तऐवजांची तपासणी केली.

तथापि, उर्वरित ग्रामपंचायतीमधील संपूर्ण दस्तऐवज पोलिस विभागामार्फत जप्त केला असल्यामुळे या चौकशी समितीला सदर दस्तऐवजाची तपासणी करता आली नाही. गट विकास अधिकारी, पंचायत समिती वर्धा यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, वर्धा यांचेकडे या

दस्तऐवजांची मागणी केली असता, ती तपासात असल्यामुळे पुरवता येणार नाही असे कळविण्यात आले. दिनांक ०९/०२/२०१७ च्या पत्रान्वये सदर जप्त केलेला दस्तऐवज पुरविण्याकरिता मा.न्यायालयाला (सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत) विनंती करण्यात आली आहे. या प्रकरणी ४ ग्रामविकास अधिकारीग्रामसेवक यांना ४८ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी पोलीस स्टेशनमध्ये अटक करुन ठेवल्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे. दोन ग्रामसेवकांनी मा.न्यायालयाकडून जामीन घेतलेले आहेत. तसेच तत्कालीन दोन सरपंच यांनासुध्दा पोलीस कोठडी झालेली आहे.

(५) सदर प्रकरणात पोलिस विभागामार्फत सविस्तर चौकशी तपास चालू असून सद्यस्थितीत त्यांचे स्तरावरुन तपास सुरु आहे. तपासाअंती प्राप्त होणाऱ्या निर्णयानुसार संबंधिताविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## दापोली, खेड व मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यांमध्ये जलयुक्त शिवार योजनेच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१८) * ८६०५३ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली, खेड व मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यांमध्ये जलयुक्त शिवार योजनेची अनेक कामे न करता कामे पूर्ण झाल्याची दर्शवून सुमारे १० कोटी रुपयांची देयके जलसंपदा अधिकारी आणि ठेकेदार यांनी घेतली असल्याचे माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या माहितीतून स्पष्ट झाल्याने या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी दिनांक १४ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास श्री.योगेश कदम यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील प्रत्येक कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराचे पुरावे व माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेली माहिती श्री.योगेश कदम यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारातील ठेकेदार व अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी विविध प्रसारमाध्यमांमध्ये आलेल्या बातम्यांची शहानिशा करण्यासाठी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण), रत्नागिरी यांची समिती नेमली होती. सदर समितीमार्फत प्रस्तुत कामांची तपासणी करण्यात आली आहे. तसेच याबाबत पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी व विभागीय स्तरावरून विभागीय दक्षता पथकामार्फत  उघड चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, रत्नागिरी मार्फत गठीत समितीच्या अहवालानुसार तत्कालिन कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी, खेड यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात सोयीसुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१९) * ८८७४३ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरसह रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील रुग्णांचा छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयावर ताण असतांनाही या रुग्णालयात अनेक सोयी-सुविधाचा अभाव असल्याचे नुकतेच माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयातील सध्यस्थितीमध्ये ट्रामा केअर सेंटरमध्ये ११ व शिशु विभागात २ व्हेंटिलेटर, वैद्यकीय विभागात किमान १५ व्हेंटिलेटरची गरज असताना केवळ ४ उपलब्ध असून हृदयरोग विभागाशी संलग्न असलेल्या कार्डियाक विभागातील एबीजी मशीन माहे मे, २०१७ पासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय व शेडा पार्कातील राजर्षी शाहू वैदयकीय महाविद्यालयाच्या परिसरातील साफसफाईचे काम महिन्याला १५ लाख ८० हजार इतक्या रकमेमध्ये होत असताना २८ लाख ४२ हजार इतक्या रकमेमध्ये माहे जून, २०१७ पासून दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रुग्णालयात व्हेंटिलेटर व एबीजी मशीनसह अद्ययावत अन्य सोयीसुविधा पुरविण्याबाबत, तसेच जादा रकमेने साफसफाईच्या दिलेल्या कामाची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे. जून-२०१७ पूर्वी प्रस्तुत सफाईच्या कामासाठी मनुष्यबळानुसार ठेका देण्यात येत होता व त्यासाठी प्रतीसह रू.१५ लाख ८० हजार इतकी रक्कम अदा करण्यात येत होती.

तथापि, वित्त विभागाच्या दि.२ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्तुत सफाईचे काम हे मोजमापानुसार (प्रती चौरस फूट दरानुसार) न्यूनतम निविदा धारकास देण्यात आले असून त्यावरील खर्च प्रतीमाह रू.२८,४२,४७३.४७ इतका आहे.

सदर कामासाठी नियमित २०० सफाई कर्मचारी यांची नियुक्ती केली असती तर प्रती कर्मचारी रू.१६,३६७/- याप्रमाणे एकूण रू.३२,७३,४००/- इतका खर्च झाला असता.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील परबवाडी (कोल्हेभाट) ते गांगेश्वर मंदिर (आंब्रड) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२०) * ८९६६५ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील परबवाडी (कोल्हेभाट) ते गांगेश्वर मंदिर (आंब्रड) या रस्त्याचे बांधकाम माहे मार्च, २०१७ अखेरपर्यंत ग्रामपंचायत आंब्रड यांनी पूर्ण केले असून या रस्त्याची माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पडलेल्या पावसामध्ये दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारावर व त्याच्याशी संगनमत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व सदरहू रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

सदर काम माहे मार्च, २०१७ अखेर पूर्ण झालेले नसून माहे डिसेंबर, २०१६ मध्ये पूर्ण झालेले आहे.

सदर रस्ता सद्यस्थितीत सुस्थितीत आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली असून सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्याला जलयुक्त शिवार योजनेसाठी अतिअल्प निधी मिळाल्याबाबत

**(२१) * ८७५७४ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयाला जलयुक्त शिवार योजनेसाठी सामाजिक बांधीलकी निधीद्वारे सन २०१६-२०१७ या वर्षामध्ये अतिअल्प निधी मिळाल्याने जलयुक्त शिवार योजनेची कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची चौकशी करुन नाशिक जिल्हयासाठी जलयुक्त शिवार योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जसलोक हॉस्पिटलमध्ये चुकीच्या औषधाने गर्भवती महिलेच्या बाळाचा झालेला मृत्यू

**(२२) * ९३०६२ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जसलोक हॉस्पिटलमध्ये एका गर्भवती महिलेला रुग्णालयातील परिचारीकेने चुकीचे औषध दिल्याने गर्भवती महिलेच्या बाळाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २१ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिचारीकेच्या हलगर्जीपणामुळे मिसोप्रोस्ट नावाचे औषधाचा डोस दिल्यामुळे सदर महिलेच्या जुळया मुलांपैकी एकाचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन संबंधित रुग्णालय व्यवस्थापनासह दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

जसलोक हॉस्पीटलमध्ये एका गर्भवती महिलेला रुग्णालयातील परिचारीकेने चुकीचे औषध दिल्याने महिलेच्या बाळाचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याची तक्रार गावदेवी पोलीस ठाणे येथे दि.२८.०२.२०१७ रोजी दाखल करण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये दाखल तक्रारीच्या अनुषंगाने सदर परिचारीकेच्या चुकीच्या औषधोपचारामुळे बाळाचा मृत्यू झाला किंवा कसे, याबाबत शासन निर्णय दि. ३१.०१.२०१४ नुसार अभिप्राय मिळण्यासाठी अधिष्ठाता, सर जे.जे.रुग्णालय, मुंबई यांचेकडील दि. ०८.०६.२०१७ रोजी गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीकडे अभिप्रायार्थ पाठविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयामध्ये सिकलसेल रूग्णांना औषध व रक्त मिळत नसल्याबाबत

**(२३) * ८५०५९ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयामध्ये सिकलसेल रूग्णांना औषध व रक्त मिळत नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रूग्णालयामध्ये सिकलसेल आजाराची तीव्रता कमी करण्यासाठी आवश्यक असलेले 'हायड्रॉक्सिल युरिया' व 'सोडामिंट कॅप झिंकॉलेक' यासारखी किंमती औषधे व रक्तांच्या पिशव्या मोफत मिळत नसल्यामुळे सिकलसेल रूग्णांची आर्थिक गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रूग्णालयांमध्ये सिकलसेलच्या आजारावरील महत्वाच्या औषधांच्या साठयात व रक्तांच्या पिशव्यांमध्ये वाढ करून सिकलसेल रूग्णांना उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही. सिकलसेल रुग्णांना औषधी व रक्ताच्या पिशव्या मोफत पुरविल्या जातात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात क्षयरोग रुग्णांची झालेली वाढ

**(२४) * ९१७३५ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयात प्रत्येक महिन्याला क्षयरोगाचे सरासरी ६० या प्रमाणे वर्षभरात ९२० पॉझीटीव्ह रूग्ण आढळून आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या क्षयरोग रूग्ण व एचआयव्ही बाधित रूग्णांमध्ये एक्स.डी.आर. या नविन क्षयरोग आजाराचा प्रकार सुरू झाला असून या रोगावर कोणतेही औषध लागू होत नसल्यामुळे क्षयरोग आजार गंभीर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गंभीर आजारावर नियंत्रण मिळविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

बुलढाणा जिल्हयात सन २०१६ मध्ये एकूण ८३८ नवीन थुंकी दुषित क्षयरुग्ण नोंदविण्यात आले व त्याची दरमहा सरासरी ७० एवढी आहे.

(२) हे खरे नाही.

एचआयव्ही किंवा एड्स बाधित क्षयरुग्ण तसेच सर्वसाधारण क्षयरुग्णांमध्ये क्षयरोगाचा सर्वसाधारण औषधोपचार प्रथमत: (६ ते ८ महिने) देण्यात येतो.

काही क्षयरुग्ण संपूर्ण औषधोपचार पूर्ण करतीलच असे नाही. अनियमित तथा अपूर्ण औषधोपचार घेतल्यास क्षयरोगाच्या जंतूमध्ये क्षयविरोधी औषधीबद्दल रेजिस्टंन्स तयार होतो अशा क्षयरुग्णांना "ड्रग रेजिस्टंट/ एक्सडीआर क्षयरुग्ण" असे म्हणतात. अशा क्षयरुग्णांना २४ ते २७ महिने औषधोपचार द्यावा लागतो.

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत क्षयरुग्णांना लागणारी क्षयविरोधी प्रतिबंधक औषधी केंद्र सरकारतर्फे मोफत व सहज उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच ड्रग रेजिस्टंट असलेल्या क्षयरुग्णांवर सुध्दा (एम.डी.आर./एक्स.डी.आर) औषधोपचाराची सोय राज्यात सर्वत्र मोफत उपलब्ध आहे. हा औषधोपचार २४ ते २७ महिने मोफत उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर उपचार राज्यामध्ये सर्वत्र उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कासुर्डी (ता.भोर, जि.पुणे) ग्रामपंचायतीत झालेला गैरव्यवहार

**(२५) * ९१७०७ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कासुर्डी गुं. मा. (ता.भोर, जि.पुणे) येथील ग्रामपंचायतीत निधीचा अपहार व गैरकारभाराच्या चौकशीत तीन ग्रामसेवक व सरपंच दोषी असल्याचे चौकशी अहवालात सिद्ध झाल्याने दोषी अधिकाऱ्यांवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने निधीचा अपहार व गैरकारभार करणाऱ्या ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संबंधित तीन ग्रामसेवक यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. संबंधित सरपंच यांच्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ चे कलम ३९ (१) अन्वये आयुक्तांकडे कारवाई होण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बामणोली (ता.खालापूर, जि.रायगड) धरणांतर्गत जांभिवली येथील जॅकवेल व पाट दुरुस्ती करण्याबाबत

**(२६) * ८८१९६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बामणोली (ता.खालापूर, जि.रायगड) धरणांतर्गत जांभिवली येथील जॅकवेल व पाट दुरूस्ती न झाल्याने रब्बी हंगामात जांभिवली व सवणे इत्यादी ठिकाणच्या शेतकऱ्यांना दुबार पीक घेता आले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच जॅकवेल व पाट दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध असतांनाही जलसंपदा विभागाकडून या कामाकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे उपरोक्त कामे विहित कालावधीत पूर्ण झाली नाहीत त्यामुळे रब्बी हंगामात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार जांभिवली येथील जॅकवेल व पाट दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) या प्रकल्पाच्या खरीपामधील सिंचन क्षेत्राबरोबर रब्बी हंगामामध्येसुध्दा प्रत्येक वर्षी सरासरी ४० हे. क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे.

(२) प्रकल्पाच्या विमोचकामधून पाण्याची जरी गळती होत असली तरी त्याचा परिणाम शेतीच्या रब्बी मधील सिंचनावर झालेला नाही. शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना रब्बी हंगामामध्ये सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) दि.१७.११.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार महामंडळाकडे जमा होणाऱ्या बिगर सिंचन पाणीपट्टीच्या रक्कमेतून सदर दुरूस्तीचे काम करण्याचे प्रस्तावित असून त्यानुसार दुरूस्तीचे काम सन २०१७-२०१८ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयाचे दर्जोन्नती करण्याबाबत

**(२७) * ८६०१७ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील राज्य कामगार विमा योजने अंतर्गत असलेल्या रुग्णालयाचे दर्जोन्नती (अपग्रेडेशन) करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयाची दर्जोन्नती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) निवेदनाच्या अनुषंगाने, सद्यस्थितीत वरळी येथे बालरोग, शस्त्रक्रिया, अस्थिव्यंग व शल्यचिकित्सा हे विभाग कार्यरत आहेत. रुग्णालयात आय.सी.यू. सेवा संबंधी प्रस्ताव यापूर्वी जिल्हा नियोजन समितीने नाकारला आहे. डायलिसीस व ट्रामा केअर हे अतिविशिष्ट उपचारामध्ये मोडत असून राज्य कामगार विमा योजनेनुसार अतिविशिष्ट उपचार देण्याचे काम राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत खाजगी रुग्णांलयांशी टाय-अप करुन पुरविली जाते.

-----------------

## मौजे वावे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(२८) * ८५३१४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वावे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरातील सुमारे २० ते २५ गावांतील रूग्णांना उपयुक्त असल्याने या प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांकडून शासनाकडे सातत्याने पत्रान्वये मागणी करुनही सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ताब्यातील जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे कारण देवून स्थानिक अधिकारी विलंब करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जागेच्या संबंधित तातडीने निर्णय घेऊन या प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रूग्णालयात रूपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात करण्याबाबतची लोक प्रतिनिंधीची मागणी व अशा स्वरुपाच्या अन्य मागण्या एकत्रित करुन निकषानुसार पात्र रुग्णालयांचे दर्जा

उन्नतीकरण करुन बृहत आराखडयात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर बाब बृहत आराखडयात समाविष्ट झाल्यानंतर जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेची कामे यंत्राद्‌वारे केल्याबाबत

**(२९) * ८८०१७ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेची कामे यंत्राद्‌वारे करण्यासाठी बाजारभावापेक्षा दोनशे टक्के अधिक दराने देण्यात आल्याचे निविदा प्रक्रियेतील कागदपत्रांवरुन माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

तत्कालिन जिल्हाधिकारी, अकोला यांचे निर्देशानूसार ई-निविदा प्रक्रियेद्‌वारे प्राप्त दरपत्रकानूसार वाटाघाटी करून दर निश्चित करण्यात आले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गांधारेश्वर पूल ते फरशी तिठा (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३०) * ९१५९६ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गांधारेश्वर पूल ते फरशी तिठा (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या रेल्वे स्टेशनला जोडणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असून वाहतुकीची गैरसोय होत असल्याने या रस्त्याची दुरुस्ती करुन डांबरीकरण करण्याची मागणी वारंवार नागरिकांकडून होत असतानाही प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजा कळंबुशी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील दळण-वळणाच्या प्रमुख मार्गावरील दोन मोठ्या पुलांचे स्लॅब, पिलर्स अत्यंत कमकुवत झाले असल्यामुळे सदर पूल कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गांधारेश्वर पूल ते फरशी तिठा रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत व कळंबुशी गावातील पुलांची पुर्नबांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) मौजे कळंबुशी येथे खेरशेत कोकरे नायशी पेढांबे रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ३८ वर कि.मी. ७/४०० व कि.मी.८/३०० मध्ये अरुंद पूल असून सदरचे दोन्ही पूल सद्यस्थितीत सुस्थितीत आहेत. पुलावरुन वाहतुक सुरळीत सुरु आहे. तथापि,पुलाची काही ठिकाणी दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(३) प्रश्नांकित रस्त्याची एकूण लांबी १.२०० कि.मी. आहे.त्यापैकी ०/०० ते ०/२५० कि.मी. लांबी ही नगरपालीकेच्या हद्दीमध्ये आहे. ०/२५० ते १/२०० ही ०.९५० कि.मी. लांबी जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे. या लांबीपैकी ०/२५० ते १/००कि.मी. या ०.७५० कि.मी. लांबीमध्ये सन २०१५-१६ मध्ये रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत डांबराने खड्डे भरण्याचे काम करण्यात आले आहे. हा रस्ता रेल्वे स्टेशनला जोडणारा रस्ता असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुक सुरु असते. तसेच अति पर्जन्यवृष्टीमुळे सदरचा रस्ता नादुरुस्त झाला असल्याने रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला जिल्हा वार्षिक योजना/३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

तसेच प्रश्नांकित पुल हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असून कि.मी. ७/४०० मधील पूलाचे दुरुस्तीचे काम निविदा स्तरावर असून कि.मी.८/३०० मधील पूलाच्या दुरुस्तीच्या कामाला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदलीबाबत

**(३१) * ९१७६५ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यापुढे सुगम व दुर्गम या दोन प्रकारातच बदल्यांचे नियोजन करण्याचे आदेश देणारा नवा अध्यादेश शासनाने नुकताच काढला असून बदली धोरणाविरोधात शिक्षकांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुगम व दुर्गम या भागाचे शासनाचे निकष काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांचे जिल्हांतर्गत बदलीचे धोरण शासन निर्णय दि.२७.२.२०१७ अन्वये विहीत करण्यात आले असून, याबाबत काही जिल्हयातील शिक्षकांनी माहे एप्रिल २०१७, मे २०१७ व जून २०१७ मध्ये मोर्चे काढले होते.

(२) दि. २७.२.२०१७ चे शासन निर्णयानुसार सर्वसाधारणपणे जे क्षेत्र तालुका मुख्यालयापासून दूर आहे, दळणवळणाच्या दृष्टीने त्या शाळेत अथवा गावात पोहोचण्यास सोईसुविधा नाहीत, दुर्गम व डोंगराळ भागातील गावे तसेच काम करण्यास प्रतिकूल परिस्थिती असलेली गावे ही अवघड क्षेत्रे म्हणून निश्चित करण्यात येणार असून अवघड क्षेत्रात न मोडणारी गावे ही सर्वसाधारण क्षेत्रात समाविष्ट होणार आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तालुक्यातील सर्वसाधारण तसेच भौगोलिक परिस्थितीचा विचार करून, अवघड क्षेत्र घोषित करण्याचा निर्णय घ्यावयाचा आहे.

(३) शिक्षकांशी शासन स्तरावर चर्चा करण्यात येऊन, योग्य त्या मागण्यांचा समावेश बदली धोरणात करण्यात आलेला आहे. या धोरणाच्या विरूद्ध मा. उच्च न्यायालयात विविध रिट याचिका दाखल करण्यात आलेल्या होत्या. या सर्व याचिकामध्ये मा. उच्च न्यायालयाने शासनाने विहित केलेले शिक्षकांचे बदली धोरण पारदर्शी व समान न्यायाच्या तत्वावर आधारित असल्याने कायम केलेले आहे. तसेच या धोरणासंदर्भात ज्या ज्या शिक्षक संघटनांनी शासनास निवेदने सादर केलेली आहेत अशा सर्व संघटनांशी चर्चा करून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिंगारा, चालीस टापरी आणि गोमाल (जि.बुलढाणा) गावांची शासन दप्तरी नोंद नसल्याबाबत

**(३२) * ९३५८० श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपुड्याच्या डोंगररागांमधील महाराष्ट्राच्या भूमीवर असलेल्या महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेलगतच्या भिंगारा, चालीस टापरी आणि गोमाल या तीन गावांची शासन दप्तरी नोंद नसल्याची बाब बुलढाणा जिल्हा परिषदेच्या मानव विकास अहवालातून माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिंगारा, चालीस टापरी आणि गोमाल (जि.बुलढाणा) या अतिदुर्गम गावात आदिवासी ग्रामस्थ रस्ते, वीज, शिक्षण, आरोग्यासारख्या मूलभूत सुविधांसह आधार कार्ड, रेशन कार्ड आदी सुविधांपासूनही वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातपुड्याच्या डोंगररांगांमधील महाराष्ट्राच्या भूमीवर असलेल्या तीन गावांची महाराष्ट्राच्या दप्तरी नोंद घेऊन तेथील आदिवासी ग्रामस्थांना सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

भिंगारा हे महसूली गाव असून चाळीस टापरी ही वस्ती भिंगारा गावाला लागून वन विभागाच्या वन जमिनीवर कम्पार्टमेंट नं. ६३२, ६३३ मध्ये आहे. गोमाल ही वस्ती कुवरदेव गावाला लागून वन विभागाच्या वन जमिनीवर कम्पार्टमेंट नं.६२२ मध्ये आहे.

भिंगारा ग्रामपंचायत अंतर्गत चाळीस टापरी ही वस्ती समाविष्ट केलेली आहे. भिंगारा येथे भिंगारा व चाळीस टापरी मिळून मतदान केंद्र असून एकूण १०६५ मतदार आहेत.

कुवरदेव गट ग्रामपंचायत असून या अंतर्गत सोनबर्डी हे महसुली गाव व गोमाल ही वस्ती समाविष्ट केलेली आहे. कुवरदेव येथे कुवरेदव, सोनबर्डी व गोमाल मिळून मतदान केंद्र असून एकूण ७०७ मतदार आहेत.

चाळीस टापरी व गोमाल या वस्त्या वन जमिनीवर असून या वस्त्यांना महसुली गावाचा दर्जा देणेबाबतचा प्रस्ताव उप विभागीय अधिकारी जळगाव जामोद यांच्यामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केलेला आहे.

(२) भिंगारा, चाळीस टापरी व गोमाल येथील लोकसंख्या अनुक्रमे १२८५, ५६५ व ४९६ इतकी असून आधार कार्ड धारक हे अनुक्रमे १२५८, ५५९ व ४८९ इतके आहेत. रेशन कार्ड धारकांची संख्या एकूण ४१० आहे. त्यांना स्वस्त धान्य दुकानामार्फत अंत्योदय, बीपीएल/ अन्नसुरक्षा, अन्नपूर्णा या योजने अंतर्गत साखर/धान्य/ रॉकेल वाटप करण्यात येते.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत भिंगारा, चाळीस टापरी व गोमाल येथे अंगणवाडी केंद्र कार्यरत असून अंगणवाडी केंद्रांना शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सुविधा पुरविण्यात येत आहेत. भिंगारा येथे १ ते ८ वी पर्यंत जिल्हा परिषदेची उच्च प्राथमिक शाळा, चाळीस टापरी येथे १ ते ४ थी पर्यंत व गोमाल येथे १ ते ५ वी पर्यंत प्राथमिक शाळा आहेत. तसेच भिंगारा येथील जिल्हा परिषद शाळेला लागून निवासी वस्तीगृहाची सुविधा आहे.

वन विभागाच्या विहीरीवरुन पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

भिंगारा येथे आरोग्य सुविधेसाठी उपकेंद्र असून त्याअंतर्गत गोमाल व चाळीस टापरी करिता आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.

भिंगारा, चाळीस टापरी व गोमाल हे जळगाव जामोद तालुक्याला जाणाऱ्या मुख्य रस्त्यापर्यंत कच्च्या रस्त्याने व पहाडी रस्त्याने जोडलेले आहेत.

भिंगारा येथे २३ सौर ऊर्जा पथ दिवे व चाळीस टापरी येथे १२ सौर ऊर्जा पथ दिवे उपलब्ध करून दिले आहेत. तथापि, भिंगारा, चाळीस टापरी व गोमाल येथील लोकांच्या घरात वीज व्यवस्था नाही.

(३) चाळीस टापरी व गोमाल या वस्त्यांना महसुली गावाचा दर्जा देणे, आणि भिंगारा, चाळीस टापरी व गोमाल येथे पक्के रस्ते व वीज व्यवस्था करणे याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यासाठी वन विभाग, ऊर्जा विभाग, जिल्हाधिकारी, बुलडाणा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांना सूचना देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरेड कऱ्हांड (जि.नागपूर) अभयारण्यांतर्गत असलेल्या शेतीचे वन्यप्राण्यांकडून झालेले नुकसान

**(३३) * ८९९२० श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील उमरेड कऱ्हांड अभयारण्यांतर्गत जंगलालगतच्या तारणा, विरखंडी, हरदोली, पंचखेडी, चिकना, धामना, ढाणा, रानबोडी, देणी, दहेगाव, वेळगांव, व इतर गावातील शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्यप्राण्यांनी मोठया प्रमाणात नुकसान केल्याने सन २०१४ मध्ये वनविभागाकडे नुकसान भरपाई मिळण्याबाबत शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी तक्रार करुनही अद्याप सदर परिसरातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन उमरेड कऱ्हांड अभयारण्यांतर्गत जंगलालगतच्या शेतकऱ्यांना वन्यप्राण्याकडून झालेल्या पिकांची नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) उमरेड क-हांडला अभयारण्यात फक्त कुही वन्यजीव वनपरिक्षेत्रात रानबोडी हे गाव येते. तारणा, विरखंडी, हरदोली, पंचखेडी, चिकना, धामना, ढाणा, रानबोडी, देणी, दहेगाव, वेळगांव, ही गावे उमरेड क-हांडला अभयारण्याच्या सिमेस लगतची गावे आहेत.

सन २०१४ मध्ये शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत उत्तर उमरेड व दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्रात अनुक्रमे ७४ व १८३ प्रकरणे प्राप्त झाली आहेत. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने प्रचलित शासन निर्णयानूसार उत्तर उमरेड वनपरिक्षेत्रात पिक नुकसानाच्या अनुषंगाने रु.६.१६ लक्ष तर दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्रात रु.८.१ लक्ष व कुही वन्यजीव वनपरिक्षेत्रात रु.१.४८ लक्ष इतकी नुकसान भरपाई संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास अदा करण्यात आली आहे.

(२) सदर परिसरातील शेतक-यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे दिनांक १२.०५.२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले नाही.

(३) वन विभागास प्राप्त होत असलेल्या प्रकरणाबाबत प्रचलित धोरणानुसार निर्णय घेऊन पात्र प्रकरणी संबंधितांस नुकसान भरपाई अदा केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तलई रेल्वे (ता.अकोट, जि.अकोला) या आदिवासी गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३४) * ९१८८० श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) पासून जवळच आदिवासी लोकवस्ती असलेल्या तलई रेल्वे हे गाव सन २००८ मध्ये पुनर्वसनासाठी पात्र असूनही अद्यापही या गावाचे पुनर्वसन करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार तलई रेल्वे या गावाचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) धोकाग्रस्त व्याघ्र अधिवास क्षेत्रातील गावाच्या ग्रामसभेने स्वेच्छेने पूनर्वसीत होण्यासाठी ठराव दिल्यावर सदर गावाच्या पुनर्वसनाची प्रक्रीया सुर करण्यात येते.

मेळघाट  व्याघ्र प्रकल्पा क्षेत्रातील तलई (रेल्वे) या गावाने स्वेच्छेने पूनर्वसीत होण्याचा ठराव दिनांक १७.०९.२०१६ रोजी दिला आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रकल्प बाधीत व्यक्तींचे पूनर्वसन अधिनियमातील कलम ११(१) ची अधिसूचना दिनांक ०९.०३.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

मौजा तलई रेल्वे या गावाचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने सन २०१७-१८ मध्ये वार्षिक प्रर्वतन अहवालामध्ये केंद्र शासनाकडे रु.३६४०.०० लक्षचा प्रस्ताव दिनांक १०.०३.२०१७ रोजी सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तामसा (ता.भोकर, जि.नांदेड) ग्रामीण भागात बोगस डॉक्टर व भोंदूबाबा यांनी आदिवासी बांधवाचे आर्थिक नुकसान केल्याबाबत

**(३५) * ८७६६० श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) तालुक्यातील तामसा ग्रामीण भागात मागील काही वर्षापासून बोगस डॉक्टर व भोंदूबाबा यांनी आदिवासी बांधवाचे आर्थिक नुकसान केल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बोगस डॉक्टर व भोंदूबाबांच्या उपचारामुळे आदिवासी खेड्यांमध्ये अनेक रुग्ण दगावल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे,

(४) असल्यास, त्यानुसार आदिवासी भागातील बोगस डॉक्टर व भोंदूबाबा यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करमाळा-कोंढारचिंचोली-डिकसळ (जि.सोलापूर) दरम्यानच्या भिमा नदी पात्रावरील पूल वाहतूकीस धोकादायक झाल्याबाबत

**(३६) * ८७९४७ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा-कोंढारचिंचोली-डिकसळ (जि.सोलापूर) दरम्यान भिमा नदी पात्रावरील ब्रिटीशकालीन पूल वाहतूकीस धोकादायक झाल्याने बंद करण्यात आला असल्यामुळे वाहनचालक तसेच नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पूलाचे स्ट्रक्चर ऑडीट करण्यात आले आहे काय व स्ट्रक्चर ऑडीटचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
सदर पुलावरुन जड वाहतूक बंद करण्यात आली आहे. तथापि, हलकी वाहने , दुचाकी इ. वाहतुक सुरु आहे.

या रस्त्यास भिगवण-राशीन हा पर्यायी रस्ता व पुल उपलब्ध असून सदर रस्त्यावरुन वाहतुक सुरु आहे.
(२) अधिक्षक अभियंता, संकल्पचित्र नवी मुंबई यांनी पाहणी केलेली असून सदरचा पूल वाहतुकीस योग्य नाही.

(३) प्रश्नांकित पूल हा उजनी धरणाच्या बुडीत क्षेत्रात येत असल्याने सदर पुलाचे काम पाटबंधारे विभागाकडून मंजूर करणेकामी कार्यकारी अभियंता, कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आले आहे.

तसेच पुलाचे संकल्पचित्र सर्वेक्षण करणेसाठीची यंत्रणा केवळ सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असल्याने तसेच नवीन पुल बांधण्याचा कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविला जात असल्याने सदर नवीन पुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होणे अपेक्षित आहे. तसे सार्वजनिक बांधकाम विभागास जिल्हा परिषदेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) तालुक्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम योजनेचे लाभार्थी निवडताना झालेला गैरव्यवहार

**(३७) * ८८७१६ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुका कृषी अधिकारी यांनी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम योजनेमधून उपजिविका/लॅब या घटकामधून लघु उद्योगांसाठी यंत्रसामुग्री करीता भागभांडवल व आर्थिक सहाय्य या बाबींसाठी लाभार्थी निवडताना आर्थिक व्यवहार करून लाभार्थी निवडले असल्याची बाब तसेच ठिबक सिंचन व तुषार सिंचन संचाचे अनुदान वाटप करताना सन २०१५-१६ व २०१६-१७ या आर्थिक वर्षात अनेक ठिकाणी संच उपलब्ध नसतानाही अनुदान देण्यात आले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत तालुका कृषी अधिकारी व कृषी सहाय्यक यांनी जलयुक्त शिवार योजना राबविताना जाणीवपूर्वक काही कामांचे अंदाजपत्रक ३ लाखांच्या आत व काही कामांचे ३ लाखांच्या वर तयार करून ठराविक गुत्तेदारांचे हित जोपासण्याचा प्रयत्न करुन स्वत:चा आर्थिक फायदा करून

घेतला असल्याच्या तक्रारी तालुक्यातील शेतकरी व स्थानिक नागरिकांनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अंशत: खरे आहे. पाणलोट समितीस्तरावर लाभार्थी बदलेले आहेत.

(२), (३) व (४) तक्रार आढळून आली नाही, तथापि जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत तालुका कृषि अधिकारी, गेवराई यांचे अधिनस्त जलसंधारण कामांची अंदाजपत्रके शेतपरिस्थितीनुसार करण्यात आली आहेत. जलसंधारण कामांना तांत्रिक/ प्रशासकीय मान्यता घेणे, ई-निविदा करणे, कामे वाटप, कामांना कार्यारंभ आदेश देणे याबाबतची कार्यवाही शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार उपविभागीय कृषि अधिकारी, माजलगाव यांच्या मार्फत करण्यात आलेली आहे. त्यामुळे तालुका कृषि अधिकारी व कृषि सहाय्यक यांनी ठराविक गुत्तेदाराचे हीत जोपासण्याचा प्रयत्न केल्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

तथापि उपजिविका घटकासंदर्भात बदलण्यात आलेल्या लाभार्थी प्रकरणी संनियंत्रणाचा अभाव असल्यामुळे प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून खुलासा मागविण्यात आला आहे. तसेच याबाबत संबंधित अधिकारी कर्मचारी यांची चौकशी करण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील नरेगाच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३८) * *८४८८८*  श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६-१७ या वर्षात नरेगाच्या कुशल व अकुशल कामासाठी पुरेसा निधीच मिळला नसल्यामुळे चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयासह अनेक ठिकाणी नरेगाचे काम बंद असून संपुर्ण राज्यात नरेगाच्या अकुशल कामाचे ३२ कोटी २८ लाख ८८ हजार व अकुशल कामाचे १९८ कोटी ९३ लाख ७३ हजार असे एकूण २२४ कोटी ५७ लाख ८८ हजार रूपये शासनाकडे प्रलंबित असल्याची माहिती दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील चंद्रपूर जिल्हयाला रोहयो कामासाठी कुशल व अकुशल कामाचे मिळून १६७७.३५, गडचिरोली जिल्हयाकरीता १४४३.७३, यवतमाळ जिल्हयाकरीता ९६९.६०, गोंदिया जिल्हयाकरीता १६२३.३१, भंडारा जिल्हयाकरीता ९८०.७८ तर वर्धा जिल्हयाकरीता ३३१.३१ लाख रूपयांच्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील या जिल्हयांना निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) सन २०१६-१७ मध्ये निधी अभावी कामे बंद होती. हे खरे नाही. सन २०१६-१७ मध्ये रु.२०९० कोटी निधी खर्च करण्यात आला आहे. दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या नरेगा सॉफ्टवरील आकडेवारीनुसार संपूर्ण राज्याची प्रलंबितता अकुशल रु.२८२६.४३ लक्ष, कुशल रु.२४५१.४३ लक्ष अशी एकूण रु. ५२७७.८६ लक्ष एवढी प्रदाने प्रलंबित नसून प्रदाने अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. दिनांक ०२/०८/२०१७ रोजी रु.१६९२५ लक्ष निधी अकुशलकरिता व रु. ५६८३ लक्ष निधी कुशलकरिता उपलब्ध आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

तांत्रिक कारणांमुळे दिनांक ०२/०८/२०१७ ची जिल्हानिहाय प्रलंबितता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | प्रलंबित अकुशल रक्कम | प्रलंबित कुशल रक्कम | एकूण प्रलंबित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | चंद्रपूर | ६३.४८ | ९७.३७ | १६०.८५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | गडचिरोली | ६६.५८ | ८४.८३ | १५१.४१ |
| ३ | यवतमाळ | १३३.४४ | १९६.४७ | ३२९.९१ |
| ४ | गोंदिया | ९३.७१ | २९९.०० | ३९२.७१ |
| ५ | भंडारा | ६४.२२ | २५.९७ | ९०.१९ |
| ६ | वर्धा | २७.७२ | ५५.९६ | ८३.६८ |

सन २०१७-१८ करीता अकुशल रु.८६११४.०३ लक्ष इतका निधी व कुशलकरीता रु.३७३६०.१० लक्ष इतका निधी प्राप्त झाला आहे.

पुढील निधी वेळेवर प्राप्त होण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाकडे निधी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वाढत्या प्रदूषणामुळे लहान मुलांमध्ये अस्थमा आजाराचे रुग्ण आढळून आल्याबाबत

**(३९) * ८६७६८ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाढत्या प्रदूषणामुळे ५ ते १२ वर्षाच्या लहान मुलांमध्ये १५ टक्के अस्थमा आजार असलेले रुग्ण आढळून आल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) केलेल्या सर्वेक्षणात दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वेक्षणानुसार राज्यात किती अस्थमाचे रुग्ण आढळून आले असून या रुग्णांवर योग्य औषधोपचार सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने वाढते प्रदुषण तसेच अस्थमा संदर्भात केलेले सर्वेक्षण या विभागास प्राप्त झालेले नाही. तथापी या संघटनेच्या संकेत स्थळावरील माहितीनुसार भारतातील ५ ते ११ वयोगटातील मुलांमध्ये अस्थमाचे प्रमाण सुमारे १० ते १५ टक्के असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

(२) सदर सर्वेक्षण अप्राप्त असल्याने या सर्वेक्षणानुसार राज्यातील एकूण अस्थमा रूग्णांची संख्या उपलब्ध नाही. तथापि, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत राज्यात दरवर्षी १८ वर्षाखालील मुलांची अस्थमासह इतर आजाराबाबत आरोग्य विषयक तपासणी करण्यात येते.

सदर कार्यक्रमात सन २०१६-१७ मध्ये करण्यात आलेल्या तपासणीमध्ये राज्यात १८ वर्षा खालील मुलांमध्ये ४६९०९ जणांना अस्थमाचा त्रास असल्याचे आढळून आले आहे. अस्थमा आजारावरील उपचार राज्यातील सर्व आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध आहेत. तसेच महाराष्ट्रात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम सुरू असून या कार्यक्रमांतर्गत अस्थमा असणा-या १८ वर्षाखालील मुलांना तपासणी, निदान व उपचार या सुविधा पुरविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात हृद्यविकाराच्या रुग्णांत झालेली वाढ

**(४०) * ८८१४८ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यभरात हृद्यविकाराच्या रुग्णांमध्ये वाढ झाली असून सन २०१६-१७ या वर्षात संपूर्ण राज्यात ५४१९६ हृद्यविकार झालेल्या रुग्णांची नोंद झाली असून गत वर्षीच्या तुलनेत २४ हजार हृद्यविकार रुग्णांची वाढ झाली असल्याचे शासकीय रुग्णालयातील आकडेवारीनुसार दिनांक २२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षीच्या तुलनेत फक्त मुंबई शहरात ३३ हजारपेक्षा जास्त हृद्यविकार रुग्णांची नोंद झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हृद्यविकाराच्या रुग्णांना योग्य उपचार मिळण्याबाबत व हृद्यविकार आजारावर नियंत्रणाच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) शासनामार्फत राष्ट्रीय कर्करोग, मधुमेह, हृदयरोग व पक्षाघात नियंत्रण कार्यक्रम राबविला जातो. त्याअंतर्गत हृदयरोगास कारणीभूत कारणांवर जनजागृती करण्यात येते. तसेच यावर नियंत्रण ठेवण्यासाठी रुग्णांची तपासणी केल्यानंतर त्यांना आहार व व्यायाम याबाबत समुपदेशन दिले जाते. त्याचप्रमाणे त्यांच्यावर औषधोपचार केले जातात. महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत मागील सहा वर्षात एकूण ७५६१५ इतक्या हृदयरोगावरील (Cardiac and cardiothoracic) शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून एकूण १,६०,८९५ इतक्या रुग्णांना हृदयरोगावरील उपचार दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महसूली निधीत ३० टक्के व भांडवली निधीत २० टक्के कपात करण्याच्या आदेशाबाबत

**(४१) * ९४०९८ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतक-यांना कर्जमाफीसाठी ३४ हजार कोटी आणि महानगरपालिकांना जकातीची भरपाई म्हणून १३ हजार कोटी रूपये द्यावे लागणार असल्याने वित्त विभागाने महसूली निधीत ३० टक्के व भांडवली निधीत २० टक्के कपात करण्याचे लेखी आदेश काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने जुनी कामे पूर्ण केल्याशिवाय कोणतेही नवीन कामांवर कार्यवाही सुरु करु नये तसेच प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांसाठी वित्त विभागाकडून निधी उपलब्ध असल्याची माहिती घेतल्याशिवाय निविदा काढू नये असेही लेखी आदेशात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयामुळे ग्रामीण भागातील अनेक विकासाची कामे प्रलंबित राहणार असल्याने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : (१) राज्यास वर्षभरामध्ये टप्प्या-टप्प्याने प्राप्त होणारा महसूल, मागील वर्षाच्या खर्चाचा कल तसेच वर्षभरात उद्भवणारा अनपेक्षित / तातडीचा खर्च याबाबी विचारात घेऊन अर्थसंकल्पीय निधी वितरणाची मर्यादा निश्चित करण्यात येते. राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी विविध प्रकारच्या कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ देण्याच्या योजना राबविण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला असल्याने तसेच वस्तु व सेवा विषयक कायद्यामुळे महानगरपालिकांना होणाऱ्या नुकसान भरपाईपोटी अनुदान देणे कायद्यानुसार बंधनकारक असल्याने या अनपेक्षित व तातडीच्या खर्चाच्या अनुषंगाने दि. ३०.६.२०१७ च्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ च्या प्रथम नऊमाहीकरीता भांडवली व महसूली लेख्यातील खर्चासाठी अनुक्रमे ८०% व ७०% इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) निधी उपलब्धतेची पडताळणी केल्याशिवाय बांधकाम विषयक कामांच्या निविदा काढल्यामुळे राज्यावरील वित्तीय भारात मोठया प्रमाणात वाढ होते. तसेच काही कामांना बऱ्याच कालावधीत निधी प्राप्त होत नाही व त्यामुळे त्यांच्या प्रशासकीय मान्यता व निविदा कालबाह्य होतात. या बाबी व भविष्यातील येणारे वाढीव दायित्व लक्षात घेऊन सदर निदेश देण्यात आलेले आहेत. तथापि, यामुळे ज्या बाबींसाठी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे, त्यांच्या निविदा प्रक्रियेवर कोणताही परिणाम होणार नाही.

-----------------

## पूर्णा, चारगड, चंद्रभागा, सापन (जि.अमरावती) या प्रकल्पांच्या कालव्यांचे खोलीकरण व रस्ते बांधकामासाठी निधी देण्याबाबत

**(४२) * ९१८२९ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील पूर्णा, चारगड, चंद्रभागा, सापन या प्रकल्पांच्या कालव्यांचे खोलीकरण व रस्ते बांधकाम यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बोर्डी नाला प्रकल्प, वासनी मध्यम प्रकल्प, करजगाव मध्यम प्रकल्प, भगाडी लघु पाटबंधारे योजना प्रकल्पांसाठी आवश्यक निधी देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार उक्त प्रकल्पांना निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय. मा.स्थानिक लोकप्रतिनिधी (अचलपूर विधानसभा क्षेत्र) यांनी दि.११.६.२०१७ च्या पत्रान्वये कालव्याचे खोलीकरण तथा कालव्यांवरील रस्ते बांधकाम करणे या कामांना म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत मंजूरी प्रदान करून निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

(२) होय.

(३) सन २०१७-१८ या वर्षी सदरहु प्रकल्पावर खालील प्रमाणे निधीची तरतुद करण्यात आलेली आहे.

(रु.कोटी)

| प्रकल्पाचे नांव | मागील शिल्लक | २०१७-१८ ची तरतुद | एकुण |
|---|---|---|---|
| बोर्डी नाला | २६.१५ | १० | ३६.१५ |
| वासनी (म.प्र.) | ० | ४० | ४०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| करजगांव (लपा) | ०.०२ | २० | २०.०२ |
| भगाडी (लपा) | ३.५४ | २० | २३.५४ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानातील कामाच्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(४३) * ८६९९९ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील सन २०१६-१७ मध्ये मंजूर असलेल्या कृषि विभागांतर्गत जलयुक्त शिवार अभियानातील कामाच्या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असून परिणामी सदर योजनेच्या अंमलबजावणीवर प्रतिकुल परिणाम झाल्याची तक्रार जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे दिनांक १३ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारतील संबंधितांवर कारवाई व जलयुक्त शिवार अभियानातील संथगतीने सुरु असलेली कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

उपसंचालक (कृषि) यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) उपसंचालक कृषि यांचे चौकशी अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणी गैरव्यवहार आढळून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हा परिषदेतील महिला बालकल्याण विभागात निविदा प्रकियेत झालेला गैरव्यवहार

**(४४) * ९२२६७ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेतील महिला बालकल्याण विभागात निविदा प्रकियेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामावर झालेला खर्च, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता रु.१० लाखापेक्षा जास्त असतानाही ई-निविदा प्रकिया राबविण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) दि. २४ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये अ.क्र.२ नुसार या प्रशिक्षणासाठी ज्युडो कराटेचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या व जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र असलेल्या प्रशिक्षकांमार्फत प्रशिक्षण देण्याचे नमूद असलेने ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सन २०१४-१५ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे मार्फत चौकशी करण्यात आली होती. सदर चौकशी अहवालामध्ये व स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवालामध्ये आक्षेप घेण्यात आलेले नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुंगा व पासपोली गांव (मुंबई) या परिसरातील शासकीय जमिनीवर खाजगी कंपनीने निवासी व व्यावसायिक प्रकल्प उभारल्याबाबत

**(४५) * ९३५०२ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील तुंगा गांव येथील सर्व्हे क्र. ११२ व ११५ तसेच पासपोली गांव येथील सर्व्हे क्र. ८६ व ८७ या परिसरातील जमिनीवर खाजगी कंपनीने निवासी व व्यावसायिक प्रकल्पाबाबत कंपनीच्या खाजगी सनदी लेखापाल यांनी प्रकल्प मुल्य ठरविल्यामुळे शासनाच्या करोडो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाबाबत प्रकल्प मूल्य ठरविण्याचे अधिकार शासकीय मुल्य निर्धारण अधिकारी यांना असतांनाही मुख्यवनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांनी स्वत:च्या अधिकारात विकासकाने ठरविलेल्या अंदाजपत्रकीय खर्चानुसार प्रकल्प मूल्य आकारण्याची परवानगी माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाच्या करोडो रुपयांचे नुकसान करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नॅशनल पार्कच्या जंगलात राहणाऱ्या आदिवासींना वीज पुरवठा करण्यास वन विभागाचा असलेला विरोध

**(४६) * ८५४५० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवलीच्या (मुंबई) डोंगरातील आदिवासी पाड्या समोरच मागाठाणेचे विद्युत उपकेंद्र व शेजारीच वीजनिर्मिती केंद्र असून आदिवासी योग्यती रक्कम भरण्यास व रिलायन्स एनर्जी त्याना वीज देण्यास तयार असतानाही वन विभाग ना हरकत प्रमाणपत्र देत नसल्यामुळे वीज यासारख्या मुलभूत सुविधापासून आदिवासी पाडे वंचित असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी पाड्यांना वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत व आदिवासींना मुलभूत सुविधा पासून वंचित ठेवणाऱ्या वन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) वनसंवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची व इतर आवश्यक ती पुर्व परवानगी घेऊन मुंबईला सातत्याने वीज पुरवठा करण्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये बोरीवली ते मुलूंड वीज वाहून नेण्यासाठी टोलेजंग टॉवर उभारण्यात आले आहेत.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीवरील अतिक्रमणासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट याचिका क्र.३०५/९५ मध्ये दि.७/५/१९९७ व वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीवर कोणत्याही प्रकारचे वनेत्तर कामास परवानगी देऊ नये असे मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीवरील अतिक्रमकांना कोणत्याही नवीन नागरी सोयी सुविधा देण्यात येऊ नयेत असे BMC, MSEB, BEST यांना मा.उच्च न्यायालयाने दिनांक :- ०३.१०.२००७ रोजी आदेश पारित केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेनगांव (जि.हिंगोली) येथे स्त्रीरोग तज्ञ व सोनोग्राफी सेंटर नसल्याबाबत

**(४७) * ९२४३४ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगांव, (जि.हिंगोली) याठिकाणी एकही स्त्रीरोग तज्ञ व एकही सोनोग्राफी सेंटर नसून तेथील जय गजानन मेडीकलचे मालक महेश जेथलिया यांच्या घरी ४५२ गर्भपात करण्यात आले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जय गजानन मेडीकल व सबंधीत मेडीकलचे मालक यांच्यावर अन्न व औषधी विभाग, पोलीस विभागाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) सेनगांव, जिल्हा हिंगोली या ठिकाणी एकही स्त्रीरोग तज्ञ व एकही सोनोग्राफी सेंटर नाही. हे खरे आहे. तथापि जय गजानन मेडीकलचे मालक यांच्या घरी ४०७ गर्भपात करण्याच्या किट्स व ४५ किट्स चे रिकामे कार्टन आढळले आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

मेडिकलच्या मालकावर अन्न व औषध प्रशासन विभागाकडून औषधीद्रव्ये व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० कलम २७ (ब) (ii) व २८ अन्वये सेनगांव पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ६८/२०१७ नोंदविण्यात आला असून गुन्हा तपासाधीन आहे. मेडिकलचा परवाना त्याविभागाकडून कायमस्वरुपी रद्द करण्यात आला आहे.

गुन्ह्याचा तपास पोलीस करीत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील जाधववाडी (मो), पालवण व अरण येथे जलयुक्त शिवार योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४८) * ८९६२६ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील जाधववाडी (मो), पालवण व अरण येथे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामे न करता संगनमतांने देयके अदा करुन मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार जलयुक्त शिवार योजनेच्या कामांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यातील गावांना लाल नाला व पोथरा नाला प्रकल्पातील पाणी मिळण्याबाबत

**(४९) * ८८५०९ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाल नाला प्रकल्प व पोथरा नाला प्रकल्पातील पाणी समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यातील साखर, उमरी, वासी, चिखली, नारयण पुल, पिंपळगाव, पिंपरी, गिरड, धोडगाव, अंतरगाव तसेच नंदुरी, सावलीवाघ, परडा, किन्हाळा, आरंबा, निंबा, वाघेडा या गावांना सिंचनासाठी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा.मंत्री जलसंपदा यांनी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींना वस्तुस्थिती अवगत करून देतांना स्थानिकांना उपसाद्वारे ६ % अथवा ठिबक सिंचनाचे १४ % क्षेत्राच्या मर्यादेत पाणी उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक प्रशासनास कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार तालुक्यातील गावांना लाल नाला प्रकल्प व पोथरा नाला प्रकल्पातील पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) स्थानिकांना उपसाद्वारे ६% किंवा ठिंबक सिंचनाचे १४% क्षेत्राच्या मर्यादेत पाणी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही पाटबंधारे विभागाचे दि.२१/११/२००२ च्या शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येत आहे.

(३) सन २०१७ मध्ये पोथरानाला प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातुन ११ गावाचे ३३२ शेतकऱ्यांना ३७४.१६ हे. क्षेत्रास धरणामधुन उपसासाठी मंजुरी दिली आहे.

तसेच लालनाला प्रकल्पातुन २ गावाचे ३ शेतक-यांना २९.७३ हे. क्षेत्रास धरणातून उपसाव्दारे सिंचनाकरीता मंजुरी दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड किल्ला व परिसराच्या संवर्धनासाठी जाहिर केलेल्या योजनेबाबत

**(५०) * ९३२५६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने रायगड संवर्धन या महत्वाकांक्षी योजनेमध्ये किल्ले रायगडसह परिसरातील सर्व गावांच्या विकासाचा तसेच नातेखिंड ते रायगड परिसराच्या दुपदरी मार्गाच्या प्रस्तावासाठी सुमारे २८० कोटी रूपयांच्या खर्चास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किल्ले रायगड व परिसराच्या संवर्धनासाठी जाहिर केलेल्या रूपये ६०० कोटीमध्ये गडावर गेल्या सात पिढयांपासून राहणा-या धनगर समाज बांधवांकरिता कोणत्याही योजना नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गडावर राहणा-या सुमारे २२ ते २५ कुटुंबातील परिवाराला गेल्या २५ वर्षापासून वीज पुरवठा आणि घराची दुरूस्ती पुरातत्व खात्याच्या परवानगीअभावी प्रतिक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन गडावर राहणाऱ्या धनगर समाजाकरिता सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) नाही. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ पासून पाचाड(रायगड पायथ्यापर्यंत) २६ कि.मी. रस्ता तत्वत: राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आला असून त्याच्या सुधारणा व रुंदीकरणासाठी रू.२५० कोटी अंदाजित किमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयास एप्रिल,२०१७ मध्ये मंजुरीसाठी सादर केला असून अद्याप मंजुरी अप्राप्त आहे.

(२) नाही. रायगड किल्ला जतन संवर्धन व परिसरातील पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याबाबत रायगड किल्ला विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये रस्ते,पाणीपुरवठा,वीज इत्यादी सुविधांचा समावेश आहे. त्यामुळे रायगड किल्ल्यावर रहात असलेल्या धनगर समाजास या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) या कुटुंबास विद्युत पुरवठा पुरविण्याबाबत भारतीय पुरातत्व विभागाकडून परवानगी मिळण्यासाठी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, पेण यांनी भारतीय पुरातत्व विभागाकडे परवानगी मागितली आहे.

-----------------

## डहाणू-नाशिक राज्य मार्गावरील पूलाची झालेली दुरवस्था

**(५१) * ९३०८४ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सूर्या प्रकल्पांतर्गत कालवा साखळी क्र.११/३७५ डहाणू-नाशिक राज्य मार्गावरील पूलाचे स्लॅब निखळून गंजलेल्या सळई बाहेर पडून पूल जीर्ण होऊन वाहतूकीस धोकादायक झाला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सूर्या प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालवा आणि डावा तीर कालव्यांअतर्गत किती पूलाची कालमर्यादा संपलेली आहे व सदरहू पूलांच्या देखभालीकरिता आतापर्यत किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, डहाणू-नाशिक राज्य मार्गावरील पूलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) सूर्या प्रकल्पांतर्गत उजव्या तीर कालव्याच्या सा.क्र.११/३७५ मी. वरील डहाणू-नाशिक राज्य मार्गावरील सुमारे ३५ वर्षे जुन्या पूलाच्या पृष्ठ लादीच्या दोन्ही कडेवरील लोह सळ्यांवरचे संधानकाचे आच्छादन निखळल्यामुळे लोहसळ्या उघड्या पडल्या आहेत. पृष्ठ लादीच्या प्राथमिक पाहणी अंती पूलास दुरूस्तीची आवश्यकता आहे. तथापि, पूल वाहतूकीस सकृतदर्शनी धोकादायक झालेला नाही.

(२) सूर्या प्रकल्पांतर्गत उजव्या व डाव्या कालव्यांवरील लहानमोठे २०४ पूल सुमारे ३० ते ३५ वर्षे जुनी आहेत. सर्वसाधारणपणे, बांधकामांचे आयुष्यमान सुमारे ५० वर्षे गृहीत धरण्यात येते.मागील ५ वर्षात सदर पूलाच्या देखभाल दुरूस्ती करीता कोणत्याही प्रकारचा निधी खर्च करण्यात आलेला नाही.

(३) सिंचन व्यवस्थापनांतर्गत सन २०१७ मधील पर्जन्य कालावधीनंतर आवश्यक दुरूस्ती करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## गोरेगाव (मुंबई) आरे वसाहतीतील बिबटयांचे वाढते हल्ले रोखण्याबाबत

**(५२) * ८९९६६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव-पूर्व (मुंबई) आरे वसाहतीतील चाफाचा पाडा येथील प्रणय नावाच्या अल्पवयीन मुलावर माहे मार्च, २०१७ मध्ये व रितेश मोहन वळवी या तीन वर्षाच्या बालकावर दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास बिबटयाने हल्ला केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे वसाहतीत सातत्याने बिबटयाच्या हल्ल्याची वाढ होत असल्याने नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी बिबटयाचे हल्ले रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे.

(२) आरे कॉलनीमध्ये वन्यप्राण्यांपासून नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी खालील प्रमाणे उपयायोजना करण्यात आल्या आहे.

• बचाव दलाची स्थापना करण्यात आली आहे.

• वनकर्मचाऱ्यांमार्फत रात्रंदिवस गस्त करण्यासाठी नेमणूक करण्यात आली असून नियमित पणे गस्त घालण्यात येते.

• मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने वनविभाग व स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्‌यमाने सतत जनजागृती कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येतात.

• सदर हल्ला करण्याऱ्या बिबट्‌याच्या हालचालीवर स्वयंचलित कॅमेऱ्याच्या सहाय्याने तपास घेण्यात येतो.

• सदर बिबट्‌यास ओळखून जरेबंद करण्याकरीता आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

• जनजागृतीसाठी बिबट प्रवण क्षेत्रात फलक लावण्यात आले आहेत.

(३) सदर घटनांच्या अनुषंगाने प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास व जखती व्यक्तीस आर्थिक सहाय्य अदा करण्यात आले आहे.

-----------------

## मौजे किन्ही पवार (ता.देऊळगांव राजा, जि.बुलढाणा) येथील जलयुक्त शिवार योजनेत झालेला गैरव्यवहार

**(५३) * ८६६८० डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे किन्ही पवार (ता.देऊळगांव राजा, जि.बुलढाणा) येथील जलयुक्त शिवार योजनेमधून बांधण्यात आलेले सिमेंट बंधा-यांचे काम निकृष्ट दर्जाचे करुन मोठया प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे नुकतेच माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासदंर्भात माजी सरपंच यांनी दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, खडकपूर्णा प्रकल्प विभाग, देऊळगांवराजा यांच्याकडे तक्रार अर्ज दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बंधा-यांच्या कामाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुसार गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत सिनाबांची एकुण २ कामे भौतिकदृष्ट्या पुर्ण करण्यात आलेली असून सदर कामे शासनाच्या निकषाप्रमाणे करण्यात आलेली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी तालुक्यासह १४ गावातील खरेदी विक्री व्यवहार पुर्ववत करण्याबाबत

**(५४) * ८७०५५ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या इको-सेन्सीटिव्ह झोन अधिसुचनेमध्ये समाविष्ट असलेल्या कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी तालुक्यासह इतर १४ गावातील खरेदी विक्री व्यवहार पुर्ववत करण्यासाठी मा.वनेमंत्री यांचेकडे दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास बैठकीची मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने वन्यजीव कार्यालयात दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास इको-सेन्सीटिव्ह कृति समितीने निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त गावातील खरेदी विक्री व्यवहार पुर्ववत करण्यासाठी राज्यस्तरीय वन्य जीव बोर्डाने केंद्र शासनाकडे शिफारस करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) चौकशी अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी राधानगरी यांच्या दिनांक ०८.११.२००० रोजीच्या राधानगरी अभयारण्याचे चौकशी अहवालामध्ये १४ गावातील ग्रामस्थांचे हक्क अबाधित ठेवण्यात आलेले आहेत. सदर गावांचे सर्व क्षेत्र अभयारण्यात समाविष्ठ केले आहे. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम २४ (२) (C) नुसार ग्रामस्थांचे हक्क अबाधित ठेवल्यानंतरही याच अधिनियमातील कलम २० मधील तरतूदी लागू होतात आणि त्यामुळे वारस हक्क व मृत्यपत्राखेरीज इतर कोणत्याही पध्दतीने जमिनीचे हस्तांतरण किंवा खरेदी विक्रीचे व्यवहार होवू शकत नाहीत.

पडळी (पार्ट), राधानगरी (पार्ट) व राजापूर (पार्ट) या गावातील गावठाण व मालकी क्षेत्र अभयारण्याबाहेर काढण्यासाठी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत राज्य वन्यजीव मंडळ व राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आवश्यकती कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगाव (ता.खेड, जि.पुणे) गावात राबविण्यात आलेल्या घरकुल योजनेत झालेला गैरव्यवहार

**(५५) * ९११६१ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (ता.खेड, जि.पुणे) गावात ग्रामस्थांना सन २०११-१२ मध्ये घरकुल योजनेतून मंजूर झालेला निधी सरपंच व ग्रामसेवकाने लाभार्थ्यांना न देता परस्पर अपहार केल्याने सरपंच व ग्रामसेवकावर फौजदारी गुन्हा दाखल करून सदर रक्कम व्याजासहित मिळावी अशी मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार घरकुलाच्या निधीचा अपहार करणाऱ्या सरपंच व ग्रामसेवकावर कारवाई करण्याबाबत व घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना त्यांची रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी पंचायत समिती खेड मार्फत सन २०१५-१६ मध्ये चौकशी करण्यात आलेली आहे. सन २०११-१२ मध्ये यशवंत घरकुल योजनेअंतर्गत ४ लाभार्थ्यांना प्रती घरकुल रक्कम रु.४७,०००/- प्रमाणे मंजूर असून ३ लाभार्थीना अनुदान रक्कम अदा केलेली आहे. उर्वरीत १ लाभार्थीस सदर मंजूर घरकुलाची रक्कम देणे बाकी आहे. तत्कालीन उपसरपंच व ग्रामसेवक यांनी अपहार केला नसल्याचे दिसून येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील वन विभागाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५६) * ९२२५६ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील ठाणे वनविभागात वन तलाव खोदणे, कर्मचारी निवास स्थान व कार्यालये दुरुस्ती व नुतनीकरण करणे,कुंपण रस्ते तयार करणे, वनांचे सुशोभीकरण करणे, जंगल सफारीची कामे करणे व वन विभागांतर्गत येणारी छोटी मोठी कामे यामध्ये ई निविदा न काढताच मजूर कामगार सहकारी संस्थामार्फत कामे घेऊन कामे न करताच देयके काढून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार वन अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार ई-निविदा न राबविता मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे मार्फत कामे न करताच देयके काढून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या वन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दैनिक प्रहारच्या दिनांक १९.०६.२०१७ रोजीचे वृत्तपत्रात "चौदा कोटीच्या कामात भ्रष्टाचार ठाणे वनविभागातील उप वनसंरक्षक कार्यालयाने ठाणे जिल्हयातील मजूर कामगार सहकारी संस्थांमार्फत केलेल्या १४ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून, या कामाची चौकशी करुन दोषींविरुध्द गुन्हे दाखल करण्याची मागणी राज्याचे वनमंत्री व वन विभागाच्या सचिवांकडे करण्यात आली आहे" असे वृत्त प्रसिध्द झाले होते. सदर वृत्तपत्रातील कात्रण विभागीय संपर्क अधिकारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय, मुंबई यांचेकडून दि.१९.०६.२०१७ रोजी प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) दैनिक प्रहार वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांनी प्रकरणाची चौकशी करण्याकरीता विभागीय वन अधिकारी (दक्षता), ठाणे यांचे अध्यक्षतेखाली

समिती स्थापन केली असून, या प्रकरणी चौकशी सुरु असून, चौकशी अंती गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास नियमानुसार तात्काळ योग्य ती कारवाई करण्यात येईल.

-----------------

## मुंबईत १८ वर्ष वयोगटातील अनाथ मुलांसाठी आधारश्रमांची गरज असल्याबाबत

**(५७) * ८५११२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सर्व वयोगटातील मिळून सध्या ३० ते ३२ अनाथाश्रम असून या अनाथाश्रमांतून १८ वर्षानंतर बाहेर पडणाऱ्या अनाथ मुलामुलींसाठी श्रद्धानंद आणि शांतीसदन फक्त दोन आधारश्रम आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आधारश्रमांमध्ये अनाथालयातून अठरा वर्ष पूर्ण झालेली, कौटुंबिक हिंसाचार समस्येतून आणि वैश्याव्यवसायातून सुटका झालेल्या मुली देखील याच आधारश्रमांमध्ये पाठविल्या जात असल्यामुळे अनाथ मुलांच्या तुलनेत आधारश्रमांची संख्या कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मुलांसाठी अधिक आधारश्रमांची सोय करण्यासाठी शासन कोणती उपयोजना करीत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) मुंबई शहर व मुंबई उपनगर असे दोन जिल्हे असून मुंबई शहर जिल्हयात सर्व वयोगटातील मिळून एकुण १६ अनाथाश्रम (बालगृह) व दोन शेल्टर होम (निवारा गृहे) कार्यरत आहेत. तसेच मुंबई शहर जिल्हयात श्रध्दानंद महिलाश्रम, माटुंगा मुंबई आणि आशासदन उमरखाडी, मुंबई असे एकुण दोन आधारश्रम आहेत. व एक अल्प मुदत केंद्र (बापूनघर) वरळी येथे कार्यरत आहे. मंजूर क्षमतेच्या तुलनेत प्रत्यक्ष दाखल प्रवेशितांची संख्या सदय:स्थितीत कमी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथे मध्यवर्ती ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला मान्यता मिळण्याबाबत

**(५८) * ८६४५० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पनवेल या मध्यवर्ती ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला मान्यता मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री, यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नसल्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही, हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जीवन अमृत सेवा योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(५९) * ८६७१८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरजू रुग्णांना इच्छित स्थळी तातडीने रक्त उपलब्ध होण्यासाठी माहे जानेवारी, २०१४ मध्ये सुरु करण्यात आलेली जीवन अमृत सेवा योजना अद्याप कार्यान्वित झाली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीवन अमृत सेवा योजनेंतर्गत मुंबईत निर्माण करण्यात येणाऱ्या आठ रक्त साठवणूक केंद्रांबाबतही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जीवन अमृत सेवा योजनेची अंमलबजावणी अद्यापपर्यंत न होण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच सदरहू योजना राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

मुंबईतील ८ रक्त साठवणूक केंद्रापैकी ४ रक्त साठवणूक केंद्र कार्यान्वीत झालेली आहेत व उर्वरीत ४ केंद्र लवकरच कार्यान्वीत करण्यात येत आहेत.

राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये सदरच्या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे व ती यशस्वीरित्या कार्यान्वीत आहे. तसेच सदरच्या योजनेअंतर्गत मुंबईमध्ये सर जे.जे.महानगर रक्तपेढी व इतर चार रक्त साठवणूक केंद्रातून अंमलबजावणी करण्यात आलेली आहे व उर्वरीत चार रक्त साठवणूक केंद्र सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) राज्यातील इतर जिल्हयांमध्ये सदरची योजना यशस्वीपणे राबविण्यात आलेली आहे. या योजने अंतर्गत एकूण ४१९६३ रक्तपिशव्यांची मागणी नोंद झाली आहे व एकूण ३३८११ रक्तपिशव्या वितरीत करण्यात आल्या आहेत. तसेच १२४७ रुग्णालय /नर्सिंग होम्स या योजने अंतर्गत नोंदणी करण्यात आलेले आहेत.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(६०) * ९३२९० श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शिवाजीनगर पडवेकरवाडी, उन्हवरे गोविंदशेत पांगारी, केळशी गुजरवाडा, कुडावळे वलजाईवाडी, उंबर्ले ओळगाव किन्हळ बुरोंडी, दाभोळ बाईतवाडी या रस्त्यांची दुरवस्था झाली असून या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांच्या कामासाठी अंदाजे ७० लक्ष रुपयांची आवश्यकता असून सदर निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वित्त मंत्री व मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ०२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यांची पाहणी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन या विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) जिल्हा परिषदेमार्फत रस्त्यांची पाहणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्नामध्ये एकूण ६ रस्त्यांचा समावेश आहे.

अ) शिवाजीनगर पडवेकरवाडी हा रस्ता इ.जि.मा. क्र. २० दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ८/१०० कि.मी. आहे. रस्त्याचा संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे.

सन २०१५-१६ मध्ये रस्ते विशेष दूरुस्ती गट-ब अंतर्गत की.मी. १/० ते १/१०० मध्ये डांबरीनुतनीकरण करणेचे रु. २.२८ लक्ष चे काम पूर्ण करण्यात आले आहे.

कि.मी. ५/८०० मधील छोट्या पूलाचे रु. ३५.०० लक्षचे काम मंजूर असून दिनांक १३/०७/२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

७.३६५ कि.मी. डांबरीपृष्ठभाग खराब आहे. व ०.७३५ कि.मी. डांबरी पृष्ठभाग सुस्थितीत आहे.

ब) पांगारी मोहल्ला बौध्दवाडी विठ्ठलवाडी गोविंदशेत ते उन्हवरे हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. २६० दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ५.७०० कि.मी. आहे. सदर रस्त्यावर सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत कि.मी. ३/० ते ३/५०० मध्ये डांबरीकरण करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण करणेत आले आहे.

क) केळशी गुजरवाडी रस्ता ग्रामीण मार्ग क्रमांक ३३६ असून रस्त्याची एकूण लांबी ०.५२० कि.मी. आहे. संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे. हा डांबरी पृष्ठभाग खराब झाला आहे.

ड) कुडावळे वळजाईवाडी ते आवाशी रस्ता ग्रामीण मार्ग क्रमांक १०१ दर्जाचा आहे. या रस्त्याची एकूण लांबी ४.३०० कि.मी. आहे. प्रत्यक्षात रस्त्याची १/६०० कि.मी. लांबी अस्तित्वात आहे. कि.मी. ०/० ते १/० हा पृष्ठभाग डांबरी असून तो खराब झाला आहे. कि.मी. १/० ते १/६०० हा खडीचा पृष्ठभाग आहे. उर्वरीत कि.मी. १/६०० ते ४/५०० ही लांबी अस्तित्वात नाही.

इ) उंबर्ले ओळगाव किन्हळ देवके बुरोंडी रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.१५ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ९.०० कि.मी. आहे. रस्त्याचा संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे. ५.१६० कि.मी. डांबरी पृष्ठभाग खराब आहे. व कि.मी. ३.८४० कि.मी. पृष्ठभाग सुस्थितीत आहे.

सदर रस्त्यावर अतिवृष्टी कार्यक्रम अंतर्गत सन २०१४-१५ मध्ये कि.मी. ८/४०० ते ८/९७० (०.५७०मी) मध्ये डांबरीनुतनीकरण करण्याचे रु. १०.०० लक्षचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना कार्यक्रम अंतर्गत कि.मी. ३/० ते ३/४४० मध्ये डांबरीकरण करणेचे रु. ७.५० लक्षचे काम सार्वजनिक बांधकाम उपविभाग दापोली यांचेमार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

ई) दाभोळ बाईतवाडी हा रस्ता योजनाबाह्य आहे. रस्त्याची एकूण लांबी ०.९०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/० ते ०/५०० कि.मी. लांबी अस्तित्वात असून हा पृष्ठभाग खडीचा आहे. कि.मी. ०/५०० ते ०/९०० या भागात रस्ता अस्तित्वात नसून या ठिकाणी पायवाट आहे. या ठिकाणी नविन रस्ता तयार करणे आवश्यक आहे.

वरीलपैकी दाभोळ बाईतवाडी या योजनाबाह्य रस्त्याचे काम हे ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती योजनेअंतर्गत घेता येत नाही. त्यामुळे हे काम स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेणे आवश्यक आहे.

तसेच उर्वरीत रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकष यांच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कौठा (ता.कंधार, जि.नांदेड) येथील मन्याड नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम सुरु करण्याबाबत

**(६१) * ९११४८ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौठा (ता.कंधार, जि.नांदेड) येथील मन्याड नदीवरील पुलवजा कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम त्वरित सुरु करण्याच्या मागण्यांसाठी ५०० शेतकऱ्यांसह जनआंदोलन कृती समितीचे पदाधिकारी दिनांक ३ मे, पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मन्याड नदीवरील पुलवजा कोल्हापूरी बंधारा सन २००८ पासून मंजूर असून त्याबाबत दरवर्षी नव्याने परिपत्रक काढण्यात येते परंतु अदयापी या बंधा-याच्या कामाला सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मन्याड नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामास निधी उपलब्ध करुन काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक ३ मे, २०१७ रोजी सुमारे १०० शेतकऱ्यांसह जन आंदोलन कृती समिती ता.कंधार जिल्हा नांदेड यांचे पदाधिकारी उपोषणास बसले होते. तथापि त्याच दिवशी त्यांना उपोषणा पासुन परावृत्त करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १४/०२/२००८ अन्वये मन्याड नदीवर पुल बांधण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. स्थानीक लोकप्रतिनिधींनी पुला ऐवजी पुलवजा कोल्हापूरी बंधा-याची मागणी केली. तदनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक १८/०९/२०१५ अन्वये सदर पुलासाठी दिलेला रुपये ९० लक्ष निधी रद्द केला.

सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार केलेली जागा मौजे कौठा ते मौजे राहाटी या ग्रामिण रस्त्यावर असल्याने जिल्हाधिकारी नांदेड यांनी त्यांचे प्रशासकिय मान्यता आदेश दिनांक २७/८/२०१४, त्यांचे पत्र दिनांक १६/९/२०१६ अन्वये रद्द केले.

मौजे कौठा ते मौजे राहाटी या ग्रामिण रस्त्यावरील पुलवजा कोल्हापूरी बंधाऱ्याचे रुपये १९४.०७ लक्ष किमतीच्या नविन अंदाजपत्रकास दिनांक २५/११/२०१६ च्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद यांनी सशर्त मान्यता प्रदान केली. सदर प्रकल्पास जिल्हाधिकारी नांदेड यांचे कडुन मान्यता मिळाली नसल्यामुळे या बंधा-याच्या कामाला सुरुवात झालेली नाही, मान्यता मिळाल्यानंतर सदर कामास सुरुवात करण्यात येईल.

-----------------

## अहमदनगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्णवाहिका चालकाअभावी बंद असल्याबाबत

**(६२) * ९०२७८ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने रुग्णवाहिका चालकांची पदे भरली नसल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरातील ७० रुग्णवाहिका गेल्या दोन महिन्यापासून चालकाअभावी बंद असल्याने ग्रामीण भागातील रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची माहिती दिनांक २० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अहमदनगर जिल्हा परिषदेने नवीन ५२ रुग्णवाहिकांचा प्रस्ताव आरोग्य विभागाकडे मंजूरीसाठी पाठविला असून अद्याप प्रस्तावास मंजुरी मिळाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर प्रस्ताव मंजुर करण्याबाबत व चालकाची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत जिल्हयातील ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ७० ठिकाणी शासकीय वाहने उपलब्ध असुन कंत्राटी वाहनचालकांची नेमणुक करण्यात येते. यापुर्वीच्या आदेशाप्रमाणे कंत्राटी वाहनचालकांची सेवा दिनांक ३१/०३/२०१७ रोजी संपुष्टात आली आहे आणि नवीन वाहनचालक कंत्राटी तत्वावर नेमण्याची प्रक्रिया चालू असून लवकरच पुर्ण होईल.

सद्यस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत रुग्ण कल्याण समिती मधुन आवश्यकतेनुसार रोजंदारी तत्वावर वाहनचालकांची सेवा उपलब्ध करुन घेणेबाबत सर्व वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांना सुचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे रुग्णसेवेवर काहीही विपरीत परिणाम झालेला नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

२३ प्रा.आ. केंद्रात व ५ पथकाच्या ठिकाणी वाहने नाहीत तसेच ४१ प्रा.आ.केंद्राची व मुख्यालयाची ५ वाहने जुनी असल्याने ती वारंवार दुरुस्ती करावी लागत आहेत. त्यामुळे प्रा.आ.केंद्राच्या ठिकाणी नविन रुग्णवाहिका व मुख्यालयाच्या ठिकाणी नविन वाहनांची मागणी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे जि. प. कडून करण्यात आलेली आहे. मान्यता प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) वाहन व रुग्णवाहिकांच्या उपलब्धतेच्या अनुषंगाने जि. प. अहमदनगर यांनी दि. २९/२/२०१६, दि.१४/१२/२०१६, दि. ३०/१२/२०१६ तसेच दि.१२/५/२०१७ अन्वये पाठपुरावा केला आहे. तसेच वाहनचालकाची पदे कंत्राटी तत्वावर नेमण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे अंतापूर (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील दलित वस्ती सुधार योजना व नवबौध्द विकास योजनेंतर्गतची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(६३) * ८७६६८ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंतापूर (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील दलित वस्ती सुधार योजना व बौध्द विकास योजनेतील कामे निकृष्ट दर्जाची करुन ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामसेवकाने संगनमताने १४ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामसेवकावर कारवाई करण्यासह बौध्द वस्तीतील निकृष्ट कामे शासनाच्या गुणवत्ता दर्शक तत्त्वानुसार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, मौजे अंतापूर (ता.बागलाण,जि.नाशिक) येथील दलित वस्ती सुधार योजना व बौध्द विकास योजनेतील कामे निकृष्ट प्रतीची करून अपहार केल्याबाबतची बातमी दैनिक लोकमतमध्ये दि.२८.०४.२०१७ रोजी प्रसिध्द झाली होती.

(२) होय. सदर प्रकरणी गट विकास अधिकारी, बागलाण यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) मौजे अंतापूर, ता.बागलाण, जि.नाशिक येथे अनु.जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेतून सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात मंजूर तीन कामांपैकी सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. सदर कामांची एकूण पूर्ण रक्कम रू.१४,०५,११५/- ग्रामपंचायतीस अदा केली आहे. दि.२८.०४.२०१७ रोजी दैनिक लोकमतमध्ये प्रसिध्द झालेल्या उपरोक्त बातमीमध्ये नमूद केल्याप्रमाणे कॉंक्रीटच्या रस्त्याऐवजी डांबरीकरणाचे रस्ते केले हे म्हणणे चुकीचे असून मंजूर कामाप्रमाणेच रस्ता कॉंक्रीटीकरणाचे काम केले असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले आहे. सदर कामांचे लेखापरिक्षण झाले असून कामांचे अंदाजपत्रक / मुल्यांकन दप्तरीलेखे अद्ययावत असल्याने लेखापरिक्षणात कोणताही आक्षेप नोंदविण्यात आलेला

नाही. सदर कामांची जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे शाखा अभियंता व उपअभियंता यांनी तपासणी व मुल्यांकन केले आहे. त्यामुळे दैनिक लोकमतमध्ये आलेल्या बातमीत कोणतेही तथ्य आढळून आले नाही. सबब ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामसेवकावर कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर व औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील बायोमेडीकल वेस्टबाबत

**(६४) * ८५०६३ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील ‘बायोमेडीकल वेस्ट’ ची योग्य पध्दतीने व नियमानुसार विल्हेवाट लावण्यात येत नसल्याबाबतची माहिती माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच औरंगाबाद शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय घाटी या रुग्णालयातील बायोमेडीकल वेस्टच्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रशासनाने बसवलेली ईन्सीनरेटर मशीन बिघाड झाल्याने बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रूग्णालयातील बायोमेडीकल वेस्ट वस्तुंची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याकरीता ती सुपर हायजोनिक एजन्सीकडे सुपुर्द करायची असतांना तेथील सफाई कर्मचारी उघड्यावर टाकत असल्याने त्याचा त्रास डॉक्टर, कर्मचारी, रूग्ण व रूग्णांच्या नातेवाईकांना होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व बायोमेडीकल वेस्टची योग्य पध्दतीने व नियमानुसार विल्हेवाट लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे. प्रस्तुत इन्सीनरेटर मशीन हे सन-२००० साली खरेदी करण्यात आलेले असून आयुष्यमान संपल्यामुळे सदर मशीन सद्य:स्थितीत बंद आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबोली धरण (ता.मुरुड, जि.रायगड) लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत कालव्याचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(६५) * ८८१९७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील आंबोली धरण लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत उजव्या व डाव्या तीर कालव्याचे काम कंत्राटदाराने निविदा शर्ती व अटीनुसार विहित मुदतीत पूर्ण करणे आवश्क असताना माहे जून, २०१५ पासून या कालव्याचे काम बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरण क्षेत्रातल्या हजारो शेतकऱ्यांना कालव्याचे पाणी न मिळाल्याने त्यांना फक्त खरीप हंगामाचे पीक घ्यावे लागले असून रब्बी हंगामाचा शेतकऱ्यांना फायदा मिळालेला नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सुधारित दराने जमिनीचा मोबदला मिळावा अशी प्रकल्पग्रस्तांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कालव्याचे काम पूर्ण करून आंबोली धरण परिसरातील क्षेत्र ओलिताखाली आणून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सुधारित दराने जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) धरणाचे काम १००% पूर्ण झाले असून दोन्ही कालव्यांची कामे भूसंपदाना अभावी अपूर्ण असल्यामुळे पूर्णत: सिंचन क्षमता निर्माण झालेली नाही.

(३) प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी सुधारित दराने जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी जिल्हा न्यायालय, अलिबाग येथे दावे दाखल केलेले आहेत.
(४) आंबोली धरण परिसरातील क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी दिनांक ९.६.२०१६ च्या शासन निर्णयातील नवीन धोरणानुसार कालव्यांची कामे बंदिस्त पाईपलाईन पध्दतीने करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

शेतक-यांनी सुधारित दराने जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत दाखल केलेले दावे अलिबाग येथील मा.जिल्हा न्यायालयात न्यायप्रविष्ट आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नदीखोरे अभिकरणाची स्थापना करण्याबाबत

**(६६) * ९२०३८ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंचन विषयक बाबींच्या संदर्भात नेमलेल्या चितळे समितीने सन २०१४ मध्ये वा त्या दरम्यान शासनास सादर केलेल्या अहवालात एकात्मिक राज्य जल आराखड्याचे महत्त्व अधोरेखीत करुन राज्यात नदीखोरे अभिकरणाची (प्राधिकरण) स्थापना करण्याची शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू समितीच्या शिफारशीनुसार राज्यात नदीखोरे अभिकरणाची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम १५ नुसार नदी खोरे अभिकरणामार्फत खोरेनिहाय व उपखोरेनिहाय जल आराखडे तयार करावयाचे आहेत. तसेच सदर अधिनियमातील कलम २(१) (प) नुसार नदी-खोरे अभिकरण म्हणजे विविध नदी खो-यांसाठी कार्यरत असलेली नदी खोरे/सिंचन विकास महामंडळे आहेत. सद्य:स्थितीत राज्यातील पाच पाटबंधारे विकास महामंडळांचे

रुपांतरण विधीवत स्वरुपात नदीखोरे अभिकरण म्हणून झालेले नाही. तथापि, मजनिप्रा अधिनियम, २००५ मधील वरील तरतूदींचा विचार करता नदी खोरे अभिकरणे कार्यरत आहेत. डॉ.माधवराव चितळे समितीने राज्यातील पाटबंधारे महामंडळांचे नदीखोरे अभिकरणात रुपांतरण करण्याची शिफारस केली होती. त्यानुषंगाने एकंदरीत महामंडळांच्या कामकाजाचा सखोल अभ्यास करुन याबाबत करावयाच्या उपाययोजनांच्या शिफारशींसह परिपूर्ण अहवाल तयार करण्याकरिता उपलब्धता व उपयुक्तता यांचा विचार करुन सेवानिवृत्त भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिका-याची या कामाकरीता नियुक्ती करणेची आवश्यकता होती. महामंडळांचे नदी खोरे अभिकरणात रुपांतर करण्याच्या दृष्टीने एक एकसदस्यीय अभ्यासगट नियुक्त करण्यास व त्यानुसार, सदर अभ्यासगटात श्री.सुरेश कुमार (सेवानिवृत्त भा.प्र.से. व माजी उपलोकआयुक्त) यांची नियुक्ती करण्यास मा.मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार श्री.सुरेश कुमार (सेवानिवृत्त भा.प्र.से. व माजी उपलोकायुक्त) यांची अभ्यासगटावर नियुक्ती करण्याबाबतचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५ /प्र.क्र.८२/आ.(वर्ग-१), दि.२८.०४.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच समक्रमांकाच्या दि. २६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर अभ्यासगटामध्ये श्री.वि.म.रानडे, सेवानिवृत्त सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांची तांत्रिक अधिकारी व अभ्यासगटाचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

(२) राज्यातील पाटबंधारे महामंडळांचे नदी खोरे अभिकरणात रुपांतर करण्याच्या दृष्टीने श्री.सुरेश कुमार (सेवानिवृत्त भा.प्र.से. व माजी उपलोकआयुक्त) यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करणेत आलेल्या एकसदस्यीय अभ्यासगटाकडून दि.३० जानेवारी, २०१६ रोजी शासनास अहवाल सादर करणेत आला आहे. सदर अहवालाचे सादरीकरण प्रधान सचिव (जसं) यांच्याकडे दि.७ एप्रिल, २०१७ रोजीचे बैठकीत करण्यात आले.

सदर अभ्यासगटाकडून प्राप्त झालेल्या अहवालातील शिफारशींवर महासंचालक, मेरी, नाशिक, महासंचालक, वाल्मी, औरंगाबाद तसेच सर्व महामंडळाचे कार्यकारी संचालक यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले. सदर प्रकरणी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचेकडून अभिप्राय प्राप्त झाले आहेत. यास अनुसरुन इतर सर्व संबंधितांकडून २२ एप्रिल, २०१७, २७

जुलै, २०१७ व ५ डिसेंबर, २०१६ रोजीचे पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आले आहेत. अद्याप अभिप्राय अप्राप्त आहेत. याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आबलोली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत

**(६७) * ८५४५६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आबलोली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वर्षाला जवळपास ३० हजारपेक्षा अधिक रुग्ण तपासले जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयात वैद्यकीय उपचारार्थ येत असलेल्या रुग्णांची संख्या लक्षात घेता सदर आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्यात यावा याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदरहू आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात करण्याबाबतची लोकप्रतिनिधींची मागणी व अशा स्वरुपाच्या अन्य मागण्या एकत्रित करुन निकषानुसार पात्र रुग्णालयांचे दर्जा उन्नतीकरण करुन बृहत आराखडयात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विवेकानंदनगर (ता.मेहकर, जि.बुलढाणा) ग्रामपंचायतीच्या निधीचा केलेला अपहार

**(६८) * ९१७२६ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील विवेकानंदनगर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी व शिपाई यांनी संगनमत करुन ग्रामपंचायतीच्या निधीचा अपहार केल्याचे सिध्द झाल्यानंतर उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्या विरोधात खोटी तक्रार केल्याबाबतची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडे दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार ग्रामपंचायतीच्या निधीचा अपहार करणाऱ्या ग्रामविकास अधिकारी व शिपाई यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, बुलढाणा जिल्हयातील मेहकर, पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत, विवेकानंदनगर येथे ११ सदस्यांची कार्यकारिणी कार्यरत आहे. ग्रामपंचायतीचे पावती पुस्तक नमुना क्र. १० व सर्वसाधारण जमेचे पावती पुस्तक नमुना क्र. ७ ही पावती पुस्तके सरपंच यांचे पती, १ ग्रामपंचायत सदस्य यांचे पती व अन्य १ ग्रामपंचायत सदस्य यांनी बळजोरीने हिसकावून घेऊन ग्रामपंचायतला कुलूप लावल्याची लेखी तक्रार सदर ग्रामपंचायतीचे कर्मचारी यांनी ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, विवेकानंदनगर यांच्याकडे दि. ०३/०६/२०१७ रोजी केली आहे. सदर बाब ग्रामविकास अधिकारी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मेहकर यांना कळविली.

ग्रामपंचायत शिपाई व ग्रामविकास अधिकारी यांनी केलेल्या तक्रारीचा चौकशी अहवाल व ग्रामपंचायत कॅशबुक व घरकर, पाणीकर वसुली पुस्तकातील गैरप्रकारची चौकशी करण्याची विनंती उपसरपंच व इतर ७

सदस्यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मेहकर यांचेकडे दिनांक ०९/०६/२०१७ रोजीच्या लेखी पत्राव्दारे केलेली आहे.

(२) ग्रामपंचायतीच्या उपसरपंच व इतर ७ सदस्यांचे तक्रारीमध्ये नमूद बाबींच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मेहकर यांनी चौकशी केलेली असून चौकशीअंती अपहार सिध्द झालेला नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नसल्याचे गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मेहकर यांनी जिल्हा परिषद, बुलढाणा यांना दि. २४/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) ग्रामपंचायतीच्या निधीचा अपहार सिध्द झालेला नसल्याने कारवाईचा प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हा परिषद आरोग्य विभागातील भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(६९) * ९१६१८ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषद आरोग्य विभागात सन २०१६ मध्ये झालेल्या भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भरती प्रक्रियेत आरोग्यसेविका म्हणून नियुक्ती मिळवून देण्यासाठी एका आरोग्यसेविकेकडून पाच लाख रुपये घेतल्याचे निष्पन्न झाले असून त्यातील काही रक्कम स्विकारतांना पकडण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गैरव्यवहारात या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचाही सहभाग असल्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) रत्नागिरी जिल्हा परिषदेंतर्गत आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या महिला आरोग्य सेविका श्रीमती दिव्यांका दिलीप यादव व त्यांचे पती श्री. दिलीप यादव व अन्य एक महिला आरोग्य सेविका श्रीमती बेबीनंदा मधुकर खामकर यांनी आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या महिला आरोग्य सेविका श्रीमती शितल कैलास नेमाणे यांचा गोपनीय अहवाल प्रतिकुल करुन त्यांचा परिविक्षाधिन कालावधी वाढविण्याची धमकी देऊन त्यांच्याकडे वारंवार पैशाची मागणी केली. तक्रारदार यांचेकडुन त्यांनी ४ लाख ५० हजार रुपये रकमेचे धनादेश स्विकारले व उर्वरित ५० हजाराची रक्कम स्विकारतांना श्रीमती शितल कैलास नेमाणे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन श्रीमती दिव्यांका यादव व त्यांचे पती श्री. दिलीप यादव यांना ५० हजार रुपयाची लाचेची रक्कम स्विकारतांना दिनांक ०१.०४.२०१७ रोजी लाचलुचपत विभागाने रंगेहाथ पकडले. या प्रकरणी रत्नागिरी पोलीस ठाणे, जिल्हा रत्नागिरी येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक-१४५/२०१७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९९८ चे कलम ७, ८, १२, १३ (अ) (ड) सह १३ (२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. तसेच श्रीमती दिव्यांका यादव व श्रीमती बेबीनंदा खामकर यांना जिल्हा परिषदेच्या सेवेमधुन दिनांक ०५.०४.२०१७ रोजी निलंबित केले असुन त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

सदरच्या भरती प्रक्रियेत कोणताही गैरव्यवहार झालेला नसून भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडली आहे. जिल्हा परिषद, रत्नागिरी या कार्यालयातील कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्याचा या घटनेशी संबंध नाही.

-----------------

## दिवडा (ता.माण, जि.सातारा) येथील सिमेंट बंधाऱ्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(७०) * ९२६५७ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवडा (ता.माण, जि.सातारा) येथील धबधबे मळा येथे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत अंदाजे ३२ लाख इतका निधी मंजूर करण्यात आला असून

अद्यापपर्यंत त्याठिकाणी कोणताही बंधारा बांधण्यात आला नसून अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने देयके काढून केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात यावी यासाठी येथील नागरीक ए.के. नामदास यांनी आमरण उपोषण केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिवड ता.माण येथील सिमेंट बंधाऱ्याचे काम जलयुक्त शिवार योजनेंतर्गत नसून जिल्हा नियोजन आराखडा सन २०१६-१७ च्या निधीमधून करण्यात आले आहे.

श्री.ए.के.नामदास यांनी दि.०९ मे, २०१७ रोजी केलेले उपोषण हे बंधारा नियोजित ठिकाणी न घेता दुसरीकडे घेऊन त्यांचे शेताकडे जाणारा रस्ता बंद झाला असल्याने केलेले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील ११९ बालगृहांपैकी १०९ बालगृहांना संस्था चालकांनी बंद केल्याबाबत

**(७१) * ८७८२४ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील ११९ बालगृहांपैकी १०९ बालगृहांना संस्था चालकांनीच बंद केल्याचे दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून या बालगृहांना पुरेशा प्रमाणात निधी मिळत नसल्याने या बालगृहांची सहा ते सात कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन नांदेड जिल्हयातील बालगृहे पुर्ववत सुरु ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम २ (१४) मध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या नमुद व्याख्येमध्ये बसणारी पुरेशी बालके उपलब्ध नसल्याने बाल कल्याण समितीकडून संस्थांमध्ये बालकांचा प्रवेश झाला नसल्याने नांदेड जिल्हयातील काही बालगृहे बंद आहेत.
(२) सन २०१५-१६ मध्ये प्रलंबित असलेल्या अनुदानासाठी दाखल असलेल्या याचिका क्र.१८५६/२०१६ व इतर याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशानुसार प्रलंबित अनुदान निश्चीत करण्यासाठी शासन निर्णय दि.०१ ऑक्टोबर, २०१६ निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या समितीस संबंधित संस्थानी कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे प्रलंबित देयक निश्चित करता आलेली नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागात गेल्या वर्षभरात बालमुत्यूच्या प्रमाणात झालेली वाढ

**(७२) * ८५०३४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विभागात गेल्या वर्षभरात आतापर्यंत १ लाख १८ हजार ३७४ बालके जन्माला आली असून त्यापैकी २ हजार १६२ बालकांचा १ वर्षाच्या आत तर ३८७ बालकांचा ५ वर्षाच्या आत मृत्यू झाला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हयात माहे मार्च २०१६ ते मे २०१७ पर्यत २२ हजार ६२ बालके जन्माला आली त्यापैकी ५६० बालके वयाच्या पहिल्या वर्षीच्या आतच मुत्यूमुखी पडली असून गडचिरोली जिल्हयात गेल्या वर्षभरात १६ हजार ५७७ बालके जन्माला आली असून त्यापैकी ५०५ बालकांचा मुत्यू झाला आहे तसेच नागपूर जिल्हयात २८ हजार बालके जन्माला आली असून ३११ बालके मृत्युमुखी पडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन नागपूर विभागातील बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे

नागपूर विभागात सन २०१६-१७ मध्ये आतापर्यत १४२१७७ बालके जन्माला आली असून त्यापैकी २०५४ बालकांचा ० ते १ वर्षापर्यत व १ ते ५ वर्षापर्यंत ३६३ बालकांचा मृत्यू झाला आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये मे २०१७ अखेर १९५६२ बालके जन्माला आली असून ० ते १ वर्षापर्यंत २९५ व १ ते ५ वर्षापर्यंत ४३ बालकांचा मृत्यू झाला आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयात माहे मार्च २०१६ ते मे २०१७ अखरे ३५०५० बालके जन्माला आली. त्यापैकी ० ते १ वर्षापर्यतच्या ५५४ बालकांचा तसेच १ ते ५ वर्षापर्यंतच्या ८० बालकांचा मृत्यु झालेला आहे.

गडचिरोली जिल्हयात माहे मार्च २०१६ ते मे २०१७ अखरे २०४३७ बालके जन्माला आली. त्यापैकी ० ते १ वर्षापर्यतच्या ५७३ बालकांचा तसेच १ ते ५ वर्षापर्यंतच्या १०३ बालकांचा मृत्यु झालेला आहे.

तसेच नागपूर जिल्हयात माहे मार्च २०१६ ते मे २०१७ अखरे ५४३१४ बालके जन्माला आली. त्यापैकी ० ते १ वर्षापर्यतच्या २१२ बालकांचा तसेच १ ते ५ वर्षापर्यंतच्या ६५ बालकांचा मृत्यु झालेला आहे.

(३) बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आरोग्य विभागा मार्फत पुढील उपाय योजना करण्यात येतात - संस्थात्मक प्रसूती, नियमीत लसीकरण, नवजात काळजी कक्ष, नवजात स्थिरीकरण कक्ष, विशेष नवजात काळजी

कक्ष, एचबीएनसी व इन्टेनसिफाईड एचबीएनसी, जीवनसत्व ‘अ’ व जंतनाशक मोहिम, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार, नवसंजीवनी कार्यक्रमा अंतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकां मार्फत आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक योजना इ.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर येथील सर्वोपचार रुग्णालय व शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालयातील रक्तपेढीची वातानुकूलीत यंत्रणा बंद असल्याबाबत

**(७३) * ८६११५ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील सर्वोपचार रुग्णालय व शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालयातील रक्तपेढीची वातानुकूलीत यंत्रणा माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान बंद पडल्याने रुग्णांना देण्यात येणारा रक्तपुरवठा बंद करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयातील वातानुकूलीत यंत्रणा बंद पडण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यभरात अनेक शासकीय रुग्णालयातील रक्तपेढ्यांमध्ये अशाच प्रकारच्या समस्या वारंवार निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाचा निधी खर्च होऊनही सामान्य रुग्णांना वेळेत रक्त पुरवठा होत नसल्याने याबाबतची चौकशी करुन संबधितांवर कारवाई करण्याबाबत व रुग्णांना वेळेत रक्त पुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जागतिक आरोग्य संस्थेच्या निकषानुसार शासकीय रुग्णालयात खाटांची सोय करण्याबाबत

**(७४) * ८८२०१ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक आरोग्य संस्थेच्या निकषानुसार शासकीय रुग्णालयात दर ४० लोकांच्या मागे एका खाटांची सोय असणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एकूण ५१६ शासकीय वैद्यकीय रुग्णालयामध्ये ३२ हजार ६३० खाटा उपलब्ध आहेत सरासरीनुसार २ लाख १९ हजार ५२ लोकांमागे एक रुग्णालय आणि ३ हजार ४६४ रुग्णामागे एक खाटा उपलब्ध असल्याचे दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय रुग्णालयात अपुऱ्या वैद्यकीय सुविधा असल्याने असंख्य रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत असून जागतिक आरोग्य संस्थेच्या निकषानुसार शासकीय रुग्णालयात खाटांची सोय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमाणकानुसार ५५० लोकसंख्येस १ खाट आवश्यक आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

(३) जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमाणकानुसार रुग्णालयाचा व खाटांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१३ व ९ जून, २०१४ अन्वये राज्यात एकूण १३६८ रुग्णालये नव्याने व श्रेणीवर्धनाने

मंजूर करण्यात आली असून त्यामध्ये एकूण १०४०९ खाटांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारीत आरोग्य संस्था स्थापनेचा जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे सिव्हिल रुग्णालयांचे रुपांतर सुपर स्पेशालिटी रुग्णालयात करण्याबाबत

**(७५) * ९३९१४ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे सिव्हिल रुग्णालयांचे रुपांतर सुपर स्पेशालिटी रुग्णालयात करण्याबाबतचा निर्णय मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या बैठकीत घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र महिला व बाल रुग्णालय सुरु करण्याच्या निर्णयानुसार ठाणे जिल्ह्यातही १०० खाटांचे स्वतंत्र महिला व बाल रुग्णालय सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निर्णयान्वये ठाणे जिल्ह्यासह कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई या परिसरातील रुग्णांना याचा लाभ होणार असल्याने जिल्ह्यातील सिव्हील रुग्णालयांचे सुपर स्पेशालिटी रुग्णालयात तसेच स्वतंत्र महिला व बाल रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) ठाणे सिव्हिल रुग्णालयाचे सुपर स्पेशालिटी रुग्णालयात रुपांतर करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे स्वतंत्र महिला व बाल रुग्णालय सुरु करण्याची बाब प्रस्तावित बृहत आराखडयात विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरे (मुंबई) येथील १ हजार ४१४ हेक्टर जागा बळकावल्याबाबत

**(७६) * ८५४६५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरे (मुंबई) येथे दोन हजार ७६ हेक्टर जागा असून त्यातील ५८६ हेक्टरचा विकास झालेला असल्याने वन विभागाने दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात केवळ ७६ हेक्टर वन जमिन असल्याचे नमूद करण्यात आल्याने उर्वरित १ हजार ४१४ हेक्टर जमिन बळकावल्याची निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार १ हजार ४१४ हेक्टर जमिनीच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : (१), (२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२.१२.१९९६ रोजी दिलेल्या आदेशान्वये मुंबई उपनगर जिल्ह्यातील वनसदृष्य जमिनी Identify करण्याकरीता जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, उप वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली व जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांची समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालाच्या आधारे मुंबई उपनगर

जिल्ह्यातील एकूण १५३४ हेक्टर "वनसदृश्य" क्षेत्रापैकी कांदळवनाचे १४५८.०० हेक्टर क्षेत्रासह इतर ६७.०० हेक्टर क्षेत्र "वनसदृश्य" असल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, यांनी दिनांक २८.०७.१९९७ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे.

दिनांक १९.०४.२०१७ रोजी मुळ अर्ज क्रमांक ३४/२०१५ मध्ये मा.राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण, पश्चिम प्रदेश, पुणे येथे दाखल करण्यात आलेल्या शपथपत्रामध्ये दिनांक २८.०७.१९९७ रोजीच्या पत्राच्या आधारे ६७.०० हेक्टर क्षेत्र शासकीय जमिनीस "वनसदृश्य" असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.पांग्राशिंदे (ता.वसमत, जि.हिंगोली) येथे जलयुक्त शिवार योजनेतील बंधाऱ्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(७७) * ९३४५६ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.पांग्राशिंदे (ता.वसमत, जि.हिंगोली) येथे पाटबंधारे विभाग, नांदेड यांचेमार्फत जलयुक्त शिवार योजनेतून चालू असलेल्या बंधाऱ्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची व संथगतीने चालू असल्याबाबत ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, हिंगोली व संबंधित विभागातील अधिकारी यांच्याकडे तक्रारीचे निवेदन माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाच्या बंधाऱ्यांची पहिल्याच पावसात पडझड होऊन खोदकाम पूर्ण गाळाने भरले गेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) मौ.पांग्राशिंदे येथील एकुण ५ सिनाबां कामांपैकी ४ कामे भौतिकदृष्ट्या पुर्ण झाले असून उर्वरित १ काम अद्याप सुरु करण्यात आले नाही. पुर्ण झालेल्या कामांच्या गुणनियंत्रण चाचण्यांचे निष्कर्ष समाधानकारक आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा समुद्रपूर (जि.वर्धा) येथील तलावाचे पुनर्जीवन करण्याबाबत

**(७८) * ८८५१३ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा समुद्रपूर (जि.वर्धा) येथील तलाव प्रशासनाकडून दुर्लक्षित झाल्याने तलावातील साचलेला गाळ व झुडपांने तलावाची साठवण क्षमता कमी झाली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तलावाची साठवण क्षमता कमी झाली असल्याने स्थानिक प्रशासनाने तलावातील गाळ उपसा करून तलावाचे पुनर्जीवन करण्याकरिता प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार तलावाच्या पुनर्जीवनासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) तलावात वाढलेली जंगली झुडुपे व गाळामुळे तलावाची साठवण क्षमता कमी झाली आहे, हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) राज्यात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून याबाबत तपशिलवार सूचना दि.०६.०५.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, वर्धा यांना देण्यात आलेले आहेत.

-----------------

## पन्हळघर खुर्द व पन्हळघर बुद्रुक (ता.माणगांव, जि.रायगड) या दोन ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकाने केलेला अपहार

**(७९) * ९३६५८ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (जि.रायगड) तालुक्यातील पन्हळघर खुर्द व पन्हळघर बुद्रुक या दोन ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकाने एक वर्षाच्या कालावधीत नागरिकांच्या करातून जमा झालेली रक्कम व शासकीय अनुदान असे मिळून सुमारे २२ लाख रुपयांच्या रक्कमेचा अपहार केल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गोरेगांव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन दोषी असणा-या ग्रामसेवकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) या प्रकरणी दोषी असलेल्या ग्रामसेवकाविरुध्द गोरेगांव पोलीस ठाणे येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (गुन्हा रजिस्टर नंबर-५८/२०१७, दिनांक २०.१२.२०१६)

(३) व (४) या प्रकरणी दोषी असलेल्या ग्रामसेवकास दिनांक २८.११.२०१६ पासुन जिल्हा परिषदेच्या सेवेतुन निलंबित करण्यात आले असुन त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यात जलसिंचनाचे ५७ प्रकल्प दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याबाबत

**(८०) * ८९९६७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलसिंचनाचे ५७ विविध सिंचन प्रकल्प ३० वर्षापेक्षा जास्त काळ प्रलंबित असल्याचे भारताचे नियंत्रक आणि महालेखा परिक्षकांच्या (कॅग) अहवालाद्वारे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्प पूर्ण करण्याकरीता सुमारे ८० हजार कोटीपेक्षा जास्त निधीची आवश्यकता असून अर्थसंकल्पात दरवर्षी ८ हजार कोटीची तरतूद सिंचनासाठी करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रलंबित प्रकल्पांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार या प्रलंबित सिंचन प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे. राज्यातील ३५९ बांधकामाधीन प्रकल्पांच्या कामांची उर्वरित कामांची किंमत रु.८४,११७ कोटी असून सन २०१७-१८ करिता रु.८२८३ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रकल्प पूर्णत्वाच्या कोणत्या टप्प्यावर आहे, याबाबत आढावा घेवून त्यानुसार प्रकल्पाचा अग्रक्रम ठरविण्यात येईल व या प्राधान्यक्रमानुसार आर्थिक गुंतवणूक केली जाईल. ज्या प्रकल्पांपासून पुढील ३ वर्षामध्ये प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांस मिळू शकेल, अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्याचा निर्णय वित्त विभागाच्या श्वेतपत्रिकेमध्ये शासनाने घेतला आहे. मा.राज्यपाल महोदयांचे निर्देश व राज्याची अर्थोपायाची स्थितीनुसार वार्षिक अर्थसंकल्पात प्रकल्पांसाठी तरतूद करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(८१) * ८६४२० श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील मालपवाडी, भुदरगड तालुक्यातील आंबवणे व कुंभोज, शिरोळ तालुक्यातील तमदलगे येथे

जलयुक्त शिवार योजनेच्या कामकाजात वनविभाग व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याचे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार जलयुक्त शिवार योजनेच्या कामांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) यासंदर्भात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.परिषद कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे. सदर समितीने अहवाल सादर केला असून सदर अहवालानूसार : १) प्रस्तुत कामे तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी घेऊन ई-निविदा पद्धतीचा अवलंब करून कामे केलेली आहेत. २) अंदाजपत्रक जलसंपदा विभागाच्या चालू प्रादेशिक दरसुची ऐवजी जिल्हा दरसुचीप्रमाणे केल्याचे आढळून आले आहे त्यामुळे कामांवर जादा खर्च झाला आहे. ३) दगडी शुष्क बांध व सिमेंट नाला बांध कामांची संख्या व मापे प्रशासकिय मंजूरीप्रमाणे केल्याचे दिसून येत नाही.

त्यामुळे संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असून शासनाच्या झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी व्दिसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दापोली, खेड व मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(८२) * ९३२९७ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुक्यातील चिखली (अडखळ) उसगाव, खेड तालुक्यातील आंबवली संभाजीनगर, वाडीमालदे व मंडणगड तालुक्यातील लाटवण ते पिंपळगाव या रस्त्यांची दुरवस्था झाली असून या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांच्या कामासाठी अंदाजे ५० लक्ष रुपयांची आवश्यकता असून सदर निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वित्त मंत्री व मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ०२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यांची पाहणी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन या विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) जिल्हा परिषदेमार्फत रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्नामध्ये एकूण ४ रस्त्यांचा समावेश आहे.

अ) दापोली तालुक्यातील चिखली (अडखळ) उसगाव हा ग्रामीण मार्ग क्र. २८४ आहे. या रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. असून संपूर्ण पृष्ठभाग खडीचा आहे. या रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

ब) खेड तालुक्यातील आंबवली संभाजीनगर हा रस्ता योजनाबाहय असून ०.३०० कि.मी. लांबीची पायवाट आहे. या ठिकाणी नवीन रस्ता करणे आवश्यक आहे.

क) खेड तालुक्यातील वाडी मालदे रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ४४ असून सदर रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/० ते १/७५० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची, १/७५० ते २/०० कि.मी. लांबी खडी पृष्ठभागाची व २/०० ते ३/०० या लांबीमध्ये रस्ता अस्तित्वात नसून नवीन रस्ता तयार करणे आवश्यक आहे.

या रस्त्याचे ०/३०० कि.मी. लांबीचे रक्कम रु ५.०० लक्ष चे डांबरी नुतनीकरणाचे काम रस्ते विशेष दुरुस्ती गट-ब अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. कि.मी.०/३०० ते १/३०० लांबीतील डांबरी पृष्ठभाग सुस्थितीत आहे.

ड) मंडणगड तालुक्यातील रामा ९७ ते लाटवण पिंपळगाव मंणचेकरवाडी या ग्रामीण मार्ग क्र.११५ एकूण लांबी ५/०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते ४/६०० कि.मी. ही लांबी डांबरी पृष्ठभागाची व ४/६०० ते ५/०० कि.मी. ही लांबी खडी पृष्ठभागाची आहे. या रस्त्याच्या २/०० ते २/७०० कि.मी. लांबीचे डांबरी नुतनीकरणाचे रु १०.०० लक्षचे काम जिल्हा परिषदेमार्फत व २/७०० ते ३/०० कि.मी.लांबीचे रु.१०.०० लक्षचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. तसेच ०/०० ते २/०० कि.मी. मध्ये डांबराने खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आला आहे.

वरीलपैकी आंबवली संभाजीनगर या योजनाबाह्य रस्त्यांचे काम हे ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती योजनेअंतर्गत घेता येत नाही. त्यामुळे ही कामे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेणे आवश्यक आहे.

तसेच उर्वरीत रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकष यांच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शेत जमिनीवर बुलडोझरचा वापर केल्याने पाईपलाईन व रस्त्याचे झालेले नुकसान

**(८३) * ८८२०६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील अनेक गावातील शेतक-यांनी उत्पन्नाखालील जमिनी खाजगी क्षेत्रातील लोकांना विक्री केल्याने अस्तित्वात

असलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पाईप व रस्त्याचे नुकसान होत असल्याबाबतची तक्रार तहसिलदार यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी खरेदीदारांनी बुलडोझरचा वापर करून ग्रामस्थांसाठी असलेल्या सोयी-सुविधा नष्ट केल्याने परिसरातील ग्रामस्थांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन पाणीपुरवठा योजनांचे पाईप व रस्त्याचे नुकसान करणाऱ्यांवर कारवाई करण्यासह जमीन मालकांकडून नुकसान भरपाई घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ग्रामपंचायत कोल्हारे यांनी तहसिलदार, कर्जत यांना दिनांक २३/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील नेरळ विकास प्राधिकरण हद्दीत अनेक बिल्डरांच्या इमारतींचे बांधकाम जिल्हा परिषद प्राधिकरणाच्या परवानगीने चालू असून, अनेकांनी भराव टाकले असून, पावसाचे पाणी येण्या-जाण्यासाठी नाला/वाट ठेवली नसल्यामुळे पावसाळ्यात पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे, याबाबत योग्य ती समज देऊन कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. तसेच, ग्रामपंचायत कोल्हारे यांनी संबंधित विकासकांना आवश्यक कार्यवाही करण्यासाठी कळविले आहे.
(२), (३) व (४) तहसिलदार, कर्जत यांचे कार्यालयाच्या दि. ०७/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये नेरळ विकास प्राधिकरण यांना विकासकांनी अनधिकृत भराव टाकून बुजविलेल्या नाल्याच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच, दि. १०/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संबंधित विकासकांविरुद्ध नियमानुसार कारवाई करणेबाबत ग्रामपंचायत कोल्हारे यांना कळविण्यात आले आहे.

आणि, जिल्हा परिषदेच्या दि. २४/०७/२०१७ रोजीच्या आदेशान्वये ग्रामपंचायत कोल्हारे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी

कार्यकारी अभियंता (बांधकाम), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जि.प. रायगड व सहायक संचालक नगररचना रायगड यांची चौकशी समिती नियुक्त करण्यात आली असून, चौकशी समितीच्या अहवालानुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## मौजे ढाकमोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील पाझर तलावाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(८४) * ८५५३६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ढाकमोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील पाझर तलावासाठी सर्वेक्षण होऊन काही अंशी भूसंपादन करण्यात आले असून गत २५ वर्षांपासून हा प्रकल्प प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाझर तलावाचे काम पूर्ण झाल्यास ढाकमोलीसह पंचक्रोशीतील निवळी, वहाळ, तुरंबव, ओमळी, पालवण, खरवते आदी गावांतील शेकडो हेक्टर जमीन ओलिताखाली येऊन येथील पाण्याची समस्या दूर होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाझर तलावाचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२) ,(३) व (४) २५ वर्षांपुर्वी सर्वेक्षण झाल्याचे नमूद करण्यात आलेला मौजे ढाकमोली हा पाझर तलाव कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, रत्नागिरी, कार्यकारी अभियंता, (लघुपाटबंधारे), जिल्हा परिषद, रत्नागिरी व कार्यकारी अभियंता, कोकण पाटबंधारे विकास मंडळ या तीनही कार्यालयांच्या कार्यकक्षेत नसल्याचे त्यांचेकडून कळविण्यात आले आहे. तथापि मौजे ढाकमोली पाझर तलावासाठी काही अंशी भूसंपादन झाले असल्याची बाब उपस्थित करण्यात आलेली

असल्यामुळे त्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडून मागविण्यात आली आहे. त्यानुसार प्राप्त होणा-या माहितीच्या आधारे प्रकल्पाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## बिच्छन नदीपात्रात (जि.अमरावती) कंत्राटदाराने बेकायदेशीरपणे पांदण रस्त्यांचे काम सुरु केल्याबाबत

**(८५) * ९३५३४ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतवाडा (जि.अमरावती) येथील मल्हारा परिसरातून वाहणा-या बिच्छन नदीपात्रात कंत्राटदाराने विनापरवानगी बेकायदेशीरपणे जेसीबीच्या सहाय्याने पांदण रस्त्यांचे काम सुरु केल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी करुन बिच्छन नदीपात्रात बेकायदेशीरपणे पांदण रस्ता करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही, सदर रस्त्यास मग्रारोहयो अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सादर केलेल्या प्रस्तावास तहसिलदार, अचलपूर यांचेकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, सदर काम नदीपात्रात असल्याने पुरामध्ये वाहून जाण्याची शक्यता असल्याचे उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूर यांनी कळविल्यामुळे, तहसिलदार अचलपूर यांनी सदर काम रद्द केले आहे. सदर कामावर कोणताही खर्च झालेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत राबविण्यात येणारी तीन हजार कामे अपूर्ण असल्याबाबत

**(८६) * ८५४७१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात सन २०१४-१५ मध्ये मंजूर असलेल्या कामांपैकी २५ टक्क्यांपेक्षाही अधिक कामे दोन वर्षानंतरही अपूर्ण असल्याची बाब कामाचा आढावा घेणाऱ्या राज्याच्या रोजगार हमी आयुक्तांच्या माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत जिल्ह्यातील तहसिलदार गटविकास अधिकारी यांना नोटीस पाठवूनही त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार रोजगार हमीची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत व रोजगार हमी आयुक्तांनी आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या तहसिलदार व गटविकास अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

अकोला जिल्ह्यात सन २०१४-१५ मध्ये ३२८५ कामे सुरु करण्यात आली असून त्यापैकी आज स्थितीत २१२६ (६४.७२%) पुर्ण करण्यात आलेली आहेत व उर्वरीत ११५९ (३५.२८%) कामे अपूर्ण आहेत. यामध्ये तालुका अकोट व तेल्हारा वगळता इतर तालुके अकोला, बाळापूर, बार्शिटाकळी, मुर्तिजापूर व पातुर यांची अपूर्ण कामांची टक्केवारी २५% पेक्षा जास्त आहे.

(२) हे खरे नाही.

अपूर्ण कामे पुर्ण करण्याबाबत अकोला जिल्हयातील तहसिलदार व गटविकास अधिकारी यांना जिल्हाधिकारी स्तरावरुन वारंवार पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच आढावा बैठकीमध्ये सुध्दा अपुर्ण कामाबाबत चर्चा करुन त्यानुसार अपुर्ण कामे पुर्ण करणेबाबत पाठपुरावा करण्यात येतो.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्हयातील हिंगणघाट उपजिल्हा रुग्णालयामध्ये ट्रामा केअर युनिट सुरू करण्याबाबत

**(८७) * ८८५१६ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील राष्ट्रीय मार्ग क्रमांक ७ वरील येथील हिंगणघाट उपजिल्हा रुग्णालयामध्ये सुरु करण्यात आलेले ट्रामा केअर युनिट वैद्‌यकीय अधिकाऱ्यांच्या गैरकारभारामुळे बंद पडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ट्रामा केअर सेंटर सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी व मा.वित्त व नियोजन मंत्री, व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे पत्रान्वये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार ट्रामा केअर सेंटर सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर ट्रामा केअर युनिटचे बांधकाम पूर्ण झाले असून उच्चस्तरीय सचिव समितीने मंजूर केलेल्या पदांपैकी ट्रामा केअर युनिट हिंगणघाटसाठी १० पदांचा समावेश करण्यात आला आहे. ट्रामा केअर युनिट हिंगणघाट येथे मंजूर १० पदांपैकी एक वैद्यकीय अधिकाऱ्याचे पद भरलेले आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.